दैनिक

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २६८ I शनिवार ११ जुलै २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com


**श्री हनुमान व पिंगला नाडी...** सहजयोग्यांसाठी श्री हनुमान हे एक आदर्श आहेत. ते आपल्या पूर्ण उजव्या बाजूवर (पिंगला नाडी) कार्य करत असतात. तेच तुम्हाला जरुर ते मार्गदर्शन करतात, सदैव विवेक देतात. मदत करतात आणि तुमच्या संरक्षणाची काळजी घेतात. तसेच तुमच्या अहंकारावर नियंत्रण ठेवतात. पण त्याहीपेक्षा म हत्त्वाचे म्हणजे ते तुम्हाला गुरुविषयी समर्पणाची शक्ति देतात ते रावणाला फक्त अग्नीचे भय होते त्यांना हे माहित होते.श्रीरामांचे एकनिष्ठ सेवक होतेच पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते म्हणून त्यांनी लंकेत जाऊन लंकादहन केले; ल्यामध्ये कुणालाही, अगदी रावणालाही शारीरिक इजा झाली नाही. त्याच्या शक्तिपुढे सर्वजण भयभीत झाले. सर्व लोकांना रावणाच्या दुष्कृत्याबद्दल काही वाटत नव्हते,आता सर्वजण लंकादहन पाहून घाबरून गेले, रावण हा महापापी राक्षस आहे हे त्यांना समजून चुकले. यातून या बजरंगबलीजवळ केवढी समज व संतूलन होते हे लक्षात घेतले पाहिजे. शक्तीशाली माणसांनी असेच संयमी असले पाहिजे. शिवाजी महाराजही असेच होते. शक्ति आणि भक्ति वेगवेगळी असूच शकत नाही, आपण म्हणू शकतो की उजव्या हातात शक्ति आहे तर डाव्या हाताकडून भक्ति येणारच. हा शक्ति-भक्तीच। संगम हनुमानामध्ये पूर्णपणे दिसून येतो. तुम्हाला याचे अनुभव येतील. अशा तऱ्हेने तुमचे संरक्षण सदैव होणार आहे, या कार्यामध्ये बजरंगवली फार तत्पर आहेत. ३१ मार्च १९९९,पुणे



'सहजयोग'

भाग १०५

www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### 'पाक गँगस्टर' शहजाद भट्टी कनेक्शन? श्रीरामपूरच्या सहा तरुणांची एटीएस चौकशी

श्रीरामपूर :पाकिस्तानातील कुख्यात गँगस्टर शहजाद भट्टी याच्याशी सोशल मीडियाद्वारे संपर्क असल्याच्या संशयावरून महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) श्रीरामपुरात धडक कारवाई केली. गुरुवारी रात्री शहरात दाखल झालेल्या एटीएसच्या पथकाने शुक्रवारी सकाळी स्थानिक पोलिसांच्या मदतीने दोन ठिकाणी छापे टाकून सहा संशयित तरुणांना ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.तपासात शहजाद भट्टीच्या सोशल मीडिया पोस्ट, रील्स आणि देशविरोधी गटांशी संबंधित ऑनलाइन हालचालींची पडताळणी सुरू असून, ताब्यात घेतलेल्या तरुणांचे मोबाईल, डिजिटल डेटा व इतर कागदपत्रांची तपासणी केली जात आहे. यापूर्वी जून महिन्यातही एटीएसने श्रीराम पुरातील चार तरुणांची चौकशी केली होती. त्याच तपासाच्या अनुषंगाने ही पुढील कारवाई करण्यात आल्याचे समजते.

# शेतकऱ्यांना दिलासा..!



# कर्जमाफीतील ५० हजारांची अट रद्द

## सरसकट २ लाखांपर्यंत कर्जमाफी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'तील ५० हजार रुपयांच्या मर्यादेची अट रद्द करण्याची घोषणा विधानसभेत केली. त्यामुळे आता पात्र शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. या निर्णयामुळे महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही नव्या योजनेअंतर्गत पूर्ण लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही घोषणा केली. त्यांनी सांगितले की, राष्ट्रीयीकृत, व्यापारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीनुसार राबविण्यात येणाऱ्या या योजनेमुळे राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे.

पूर्वीच्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. मात्र, आता थकबाकी दोन लाखांपेक्षा जास्त असली तरी दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्यात येणार आहे. तसेच महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र लाभार्थ्यांसाठी असलेली ५० हजार रुपयांच्या लाभाची मर्यादा पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यांनी आणखी एक महत्त्वाची घोषणा करत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ या वर्षात नवीन कर्ज घेऊन ते वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आल्याचे सांगितले. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या अधिकाधिक शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे.

या निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला तरी एकही पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी कृषी क्षेत्रासाठी शासन दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपये खर्च करत असल्याची माहिती दिली. शेतकऱ्यांच्या वीजबिलासाठी २५ हजार कोटी रुपयांचे अनुदान दिले जात असून कापूस, सोयाबीन खरेदी, ठिबक सिंचन अनुदान आणि कृषी समृद्धी योजनेचा उर्वरित निधीही लवकरच वितरित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**कर्जमाफी योजनेचे नाव :**
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना**

| | |
|---|---|
| एकूण तरतूद : | ₹३६,५८५ कोटी |
| अंदाजे लाभार्थी शेतकरी : | ₹५६ लाख |
| प्रति शेतकरी कमाल लाभ: | ₹२ लाखांपर्यंत |

**नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहन : २०२६-२७ मध्ये नवीन कर्ज घेऊन वेळेत परतफेड करण्याची अट रद्द; पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ कायम**

### अधिवेशनाचे सूप वाजले...

अधिवेशनाच्या समारोपावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेतकरी, वारकरी आणि कष्टकरी हेच महाराष्ट्राचे खरे वैभव आहे. त्यांच्या श्रम, श्रद्धा आणि त्यागातूनच म हाराष्ट्राचा विकास घडतो. त्यांच्या आशीर्वादाने राज्याला नवाचार आणि नवा आकार देण्याचे काम शासन करेल. दरम्यान, आगामी हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर २०२६ पासून नागपूर येथे होणार आहे. सोमवार, २२ जून ते शुक्रवार, १० जुलै २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या १४ दिवसांच्या सत्रात अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. मात्र हे अधिवेशनदेखील २०२४ पासून विरोधी पक्ष नेत्याविना पार पडले. ९ जुलै रोजी सलग १८ तास कामकाजाचा विक्रम नोंदवला गेला. ९ जुलै रोजी विधानसभेचे कामकाज सलग १८ तास १० मिनिटे चालून १० जुलैच्या पहाटे ३ वाजून ३९ मिनिटांनी स्थगित झाले. त्यामुळे संसदीय कामकाजाचा एक नवा विक्रम प्रस्थापित झाला. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी दोन्ही सभागृहांच्या प्रत्यक्ष कामकाजाची सांख्यिकीय माहिती पटलावर ठेवली.

## रिंगण सोहळा...



श्रीरामपूर येथील थत्ते मैदान येथे सद्गुरू योगीराज गंगागिरीजी महाराज संस्थान सरला बेट ते पंढरपूर पायी दिंडी स्वागत श्रीरामपूर शहरात करण्यात आले. यावेळी थत्ते मैदान येते गोल रिंगण घेण्यात आले. यावेळी हजारोच्या संख्येने भाविक उपस्थित होते. छायाचित्र : सुनील पांढरे

## सावळीविहीरच्या साई जतिन दुध प्लॅन्टमधे तब्बल २२ टँकर निकृष्ट दुधाची आफरातफर




अशोक दुशिंग। राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी:** गेल्या ४० वर्षापासून दुध व्यवसायात नामचीन असलेल्या राहाता तालुक्यातील सावळी विहीर साई जतीन दूध संकलन केंद्रावर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मध्यरात्री धडक कारवाई करत केंद्राचा परवाना तात्काळ निलंबित केल्याने राहाता तालुक्यातील दुध संकलन केंद्राचे धाबे दणाणले आहेत. नगर मनमाड रोडवरील सावळीविहिर बुद्रुक गावात पंकज गाढवे यांचे मालकीचे साई जतिन दुध संकलन तसेच मिक्स ॲन्ड कोल्ड पद्धतीचा तीन मजली प्लॅन्ट आहे. साई जतीन हे दुध केंद्र गेल्या ३५ वर्षा **(पान ४ वर)**

### केंद्र सील तरीही संकलन सुरूच

दरम्यान अन्न औषध व भेसळ प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली असली तरी आज त्या ठिकाणी आमच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष भेट दिली असता, दूध संकलन सुरूच होते. तसेच प्लांटच्या सर्व यंत्रणा कार्यरत होत्या.दुधाचे शीतकरण सुरू होते व त्या ठिकाणी टँकर भरले जात असल्याचे निदर्शनास आले. नेमकी ही कारवाई काय? याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून दूध संकलन केंद्र बंद करण्याचे आदेश असताना या केंद्राची मजुरी यातून दिसून आली आहे. म्हणजेच तुकाराम मुंढे यांच्या आदेशालाच केराची टोपली दाखवत असल्याचे दिसून येते.

## बनावट दिव्यांग प्रमाणपत्राद्वारे शासकीय योजनेचा लाभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**एका विरूध्द गुन्हा**

**शेवगाव :** बनावट दिव्यांग प्रमाणपत्राचा वापर करून शासनाच्या संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेतल्याप्रकरणी संतोष रतन खरड (रा. देवटाकळी, ता. शेवगाव) याच्याविरुद्ध शेवगाव पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सोनाली लक्ष्मण दहीफळे (रा. खडोबानगर, शेवगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, संतोष रतन खरड याने सन २०२३ ते २०२६ या कालावधीत बनावट दिव्यांग प्रमाणपत्राचा वापर करून संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनंतर तत्कालीन तहसीलदार (सांगोला) यांच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली. त्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांच्याकडून संबंधित दिव्यांग प्रम ाणपत्राची पडताळणी करण्यात आली. तपासात संबंधित यु डिड आयडी प्रणालीवरील माहिती आणि सादर केलेल्या प्रमाणपत्रातील लोकोमोटर अपंगत्वाची टक्केवारी यामध्ये तफावत आढळल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर शासनाच्या निर्देशांनुसार संबंधित प्रकरणात कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार शेवगाव **(पान ४ वर)**

## शाळेभोवती टवाळखोरांची गर्दी, पाच हुल्लडबाज पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** शाळा आणि महाविद्यालय परिसरात विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत श्रीगोंदा पोलिसांनी शुक्रवारी धडक मोहीम राबवत टवाळखोरी करणाऱ्या पाच हुल्लडबाजांना ताब्यात घेतले आहे. तसेच ट्रिपल सीट आणि सायलेन्सरमध्ये बेकायदेशीर बदल करून मोठा आवाज करणाऱ्या दुचाकींवरही कारवाई करण्यात आली.


गेल्या काही दिवसांपासून शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत काही तरुण विनाकारण शाळांच्या गेटसमोर थांबणे, दुचाकींवरून वारंवार फेऱ्या मारणे, मोठ्या आवाजात हॉर्न वाजवून गोंधळ घालणे अशा प्रकारांमुळे विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याच्या तक्रारी पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या.



या तक्रारींची गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने साध्या वेशातील महिला पोलीस व अंमलदारांसह शाळा परिसरात सापळा रचला. मोहिमेदरम्यान संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या तरुणांची चौकशी करण्यात आली. टवाळखोरी करणाऱ्या पाच तरुणांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली.ताब्यात घेतलेल्या तरुणांच्या पालकांना पोलीस ठाण्यात बोलावून समुपदेशन करण्यात आले. भविष्यात अशा प्रकारची टवाळखोरी केल्यास थेट न्यायालयीन प्रक्रियेद्वारे कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.विद्यार्थ्यांची सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. **(पान ४ वर)**

## मी दोषी आढळलो तर सिद्धिविनायक मंदिरासमोर फासावर द्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिंदेंच्या आरोपांवर आदेश बांदेकरांचे प्रत्युत्तर**

**मुंबई :** राम मंदिरातील दानपेटी प्रकरणावरून सुरू झालेल्या राजकीय वादात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत महाविकास आघाडी सरकारच्या काळात सिद्धिविनायक मंदिराच्या दानपेटीत गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला. यावर तत्कालीन सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष अभिनेते आदेश बांदेकर यांनी देत मी दोषी आढळलो तर मला सिद्धिविनायक मंदिरासमोर फासावर द्या, असे विधान केले. त्यामुळे या प्रकरणातील राजकीय आरोप-प्रत्यारोप आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना बांदेकर म्हणाले, माझा कार्यकाळ संपून तीन वर्षे झाली आहेत. त्यानंतरच्या कारभाराशी माझा कोणताही संबंध नाही. सिद्धिविनायक मंदिरातील कार्यकारी अधिकारी व वित्त अधिकारी हे शासनाने नियुक्त केलेले असतात. कोणताही गैरव्यवहार झाला असेल तर शासनाने तो जाहीर करावा.

बांदेकर पुढे म्हणाले, आणखी एक गोष्ट, उगाच धूर बघून आग लागली आहे असं काही करू नका. व्यवस्थित चोख कारभार करा. स्वत:चे गैरव्यवहार लपवण्यासाठी उगाच काहीतरी आरोप करून दिशाभूल करत राहायचं असं करू नका. जर काही चुकीचं आढळलं असेल तर पाहिजे ती कारवाई करा.

माझा सहा वर्षांचा कार्यकाळ होता. पहिले तीन वर्ष जनता पक्षाचेच सदस्य माझ्याबरोबर कार्यरत होते. त्यांनाही विचारा, ज्या ज्या मिटिंग झाल्या त्याचे सगळे कागदपत्र, त्याच्या मंजुऱ्या सगळं मंत्रालयात दिलेलं आहे. ते आता तुमच्याचकडे आहेत. त्यात तुम्ही काही फेरफार केलेले असतील तर मला माहिती नाही. पण खूप स्पष्ट कारभार तिथे झालेला आहे. एक जरी माझं स्वत:चं वाऊचर आढळलं तर माझ्यावर कारवाई करा. राम कृष्ण हरी. मी काहीही केलेलं नाहीये. गणपती बाप्पा मोरया.

## सत्तेचा उन्माद! आमदारांच्या स्वीय सहाय्यक भावाकडून तरुणाला मारहाण; व्हिडिओ व्हायरल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी । राजूर :** अकोले तालुक्यातील राजूर येथे भर बाजारपेठेत एका तरुणाला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेचे कथित सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले असून, यामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ही मारहाण अकोले मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांचे स्वीय सहाय्यक भाऊ मुकुंद लहामटे आणि उपसरपंच बोटे यांनी केल्याचा आरोप पीडित तरुणाने केला आहे.

### हा सत्तेचा माज आहे का? नागरिकांचा सवाल

भर बाजारपेठेत लोकप्रतिनिधींच्या जवळच्या व्यक्तींकडून सामान्य नागरिकाला होणाऱ्या या मारहाणीमुळे हा सत्तेचा माज आहे का? असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.या संपूर्ण प्रकरणाची राजूर पोलिसांनी गंभीर दखल घ्यावी आणि दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून, अधिकृत पोलीस अहवाल आणि आमदारांच्या गटाची बाजू समोर आल्यानंतरच सत्य परिस्थिती अधिक स्पष्ट होईल.

मिळालेल्या माहितीनुसार, राजूर येथील मुख्य बाजारपेठेत हा प्रकार घडला. व्हायरल होत असलेल्या कथित सीसीटीव्ही फुटेजमध्ये तरुणाला मारहाण होत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. आमदार डॉ. किरण लहामटे यांचे पीए भाऊ मुकुंद लहामटे आणि उपसरपंच बोटे यांनी मिळून संबंधित तरुणाला बेदम चोप दिला. एवढेच नव्हे तर, जर या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल केला, तर याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी देत जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही पीडिताकडून करण्यात आला आहे.

या धक्कादायक प्रकारामुळे राजूरमधील सामान्य नागरिकांमध्ये भीती आणि तीव्र संतापाचे वातावरण आहे. मात्र, या खळबळजनक आरोपानंतरही संबंधित आमदार किंवा त्यांच्या पक्षाकडून अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका किंवा स्पष्टीकरण सम ोर आलेले नाही.

राजूरमध्ये घडलेल्या या हिंसक घटनेमागे स्थानिक राजकीय वैमनस्य असल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. नुकत्याच झालेल्या राजूर ग्राम पंचायतीच्या पोटनिवडणुकीत आमदार समर्थकांना दारुण पराभवाचा सामना करावा लागला होता.काही महिन्यांपूर्वी राजूर ग्रामपंचायतीमध्ये सुमारे १ कोटी १५ लाखांचा कथित अपहार झाल्याचे प्रकरण समोर आले होते. या भ्रष्टाचाराच्या आरोपानंतर तत्कालीन सरपंचांना पदावरून दूर करण्यात आले होते. या राजकीय भूकंपानंतर ग्रामपंचायतीवरील सत्ता माजी आमदार वैभव पिचड यांच्या गटाकडे गेली. या राजकीय पराभवाच्या रागातूनच हा प्रकार घडला का, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

# राजकारणातील गुंडशाहीला कोण आवर घालणार?




डोंबिवलीतील एका रुग्णालयात डॉक्टर आणि महिला परिचारिकेला झालेल्या मारहाणीच्या घटनेने महाराष्ट्रासमोर अत्यंत गंभीर प्रश्न उभा केला आहे. ही घटना केवळ एका रुग्णालयापुरती किंवा एका व्यक्तीच्या संतापापुरती मर्यादित नाही. सार्वजनिक सेवकांवर वाढणारे हल्ले, राजकीय कार्यकर्त्यांची वाढती आक्रमकता आणि कायद्याची उघडपणे होणारी पायमल्ली ही लोकशाहीच्या आरोग्यासाठी धोक्याची घंटा आहे. डॉक्टर, पत्रकार, पोलीस, महसूल अधिकारी, शिक्षक किंवा शासकीय कर्मचारी यांच्यावर होणारे हल्ले आता अपवाद राहिलेले नाहीत. त्यामुळे हा प्रश्न एखाद्या व्यक्तीचा नसून संपूर्ण राजकीय आणि सामाजिक संस्कृतीचा आहे.

महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा सांगणारा प्रदेश आहे. प्रत्येक राजकीय पक्ष त्यांच्या नावाचा उल्लेख करतो; परंतु त्यांच्या मूल्यांचे पालन कितपत केले जाते, हा खरा प्रश्न आहे. शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचा गाभा न्याय, शिस्त आणि प्रजेचा सन्मान हा होता. अन्याय करणारा कोणाचाही माणूस असला तरी त्याला शिक्षा झालीच पाहिजे, हा त्यांचा स्पष्ट संदेश होता. आज मात्र पक्षाची जवळीक, सत्तेचा आधार किंवा राजकीय ओळख हीच काही जणांसाठी कायद्यापेक्षा मोठी ढाल बनत असल्याचे चित्र दिसते.

लोकशाहीत सत्ता म्हणजे विशेषाधिकार नव्हे, तर उत्तरदायित्व. जनतेने दिलेला अधिकार हा लोकसेवेसाठी असतो; धाक दाखवण्यासाठी नाही. परंतु अनेकदा काही पदाधिकारी किंवा कार्यकर्ते स्वतःला कायद्यापेक्षा मोठे समजू लागतात. त्यामागे केवळ वैयक्तिक स्वभाव कारणीभूत नसतो, तर त्यांना मिळणारे राजकीय संरक्षणही तितकेच जबाबदार असते. गुन्हा घडल्यानंतर संबंधित पक्षाने तातडीने कठोर भूमिका घेण्याऐवजी आरोपीच्या बचावासाठी पुढे येण्याची प्रवृत्ती समाजात अत्यंत चुकीचा संदेश देते. निवडक नैतिकतेमुळे लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वासही कमी होतो.

रुग्णालय म्हणजे जीव वाचवण्याचे स्थान. डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी अनेकदा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम करतात. अशा ठिकाणी त्यांच्यावर हात उचलला जात असेल, तर तो केवळ एका व्यक्तीवरील हल्ला नसून संपूर्ण आरोग्य व्य... आघात आहे. ... घटनांमुळे डॉक्टरांम... असुरक्षिततेची भावना... वाढते, सरकारी सेवेत... काम करण्याची इच्छा... कमी होते आणि... त्याचा सर्वाधिक फटका... सामान्य रुग्णांनाच... बसतो. आरोग्य... व्यवस्थेवर विश्वास... टिकवायचा असेल,... तर अशा गुन्ह्यांवर तात... कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.

या घटनांचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे व्यक्तिपूजेचे वाढते राजकारण. एखाद्या नेत्यावरील निष्ठा ही संविधान, कायदा आणि सार्वजनिक नैतिकतेपेक्षा मोठी ठरू लागली की कार्यकर्त्यांमध्ये बेफिकिरी वाढते. "आपला नेता आपल्याला वाचवेल" हा विश्वासच गुंडशाहीला खतपाणी घालतो. त्यामुळे पक्ष नेतृत्वाची जबाबदारी अधिक वाढते. चुकीचे समर्थन करण्याऐवजी, दोषी व्यक्ती कोणत्याही पक्षाची असली तरी तिच्यावर कठोर कारवाई करण्याची तयारी राजकीय पक्षांनी दाखवली पाहिजे.

न्यायप्रक्रियेतील विलंब हीदेखील चिंतेची बाब आहे. अनेक गंभीर गुन्ह्यांतील आरोपी वर्षानुवर्षे न्यायालयीन प्रक्रियेत राहतात. काही जण निवडणुका लढवतात, सत्तेत येतात आणि प्रभावशाली पदांवर पोहोचतात. त्यामुळे समाजात "प्रभावशाली व्यक्तींना शिक्षा होत नाही" अशी भावना निर्माण होते. लोकशाहीत न्याय केवळ निष्पक्ष असणे पुरेसे नसते; तो वेळेवर झाल्याचे दिसणेही तितकेच महत्त्वाचे असते.

सामाजिक माध्यमांनी माहितीचा वेग वाढवला आहे; मात्र विवेक वाढवला असे म्हणता ... हिंसेचा निषेध करण्याऐवजी ... कोणत्या पक्षाचा आहे, ...न भूमिका ठरवल्या ...तात. त्यामुळे सत्य आणि असत्य यापेक्षा पक्षनिष्ठेला अधिक महत्त्व मिळते. ही प्रवृत्ती लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. हिंसा कोणाचीही असो, तिचा निषेध समान निकषांवरच झाला पाहिजे. या परिस्थितीत ...ची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते. निवडणुकीनंतरही नागरिकांनी सत्तेला प्रश्न विचारणे, कायद्याचे राज्य टिकविण्याचा आग्रह धरणे आणि चुकीचे समर्थन न करणे ही लोकशाहीची खरी ताकद आहे. गुन्हेगारी वर्तनाकडे जात, धर्म किंवा पक्षीय निष्ठेच्या चष्म्यातून पाहिले गेले, तर गुंडशाहीला सामाजिक मान्यता मिळते. हा लोकशाहीचा सर्वांत मोठा पराभव ठरेल.

डोंबिवलीतील घटना म्हणूनच केवळ एका डॉक्टरवरील हल्ल्याची घटना नाही. ती महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीची परीक्षा आहे. एकेकाळी सामाजिक सुधारणा, शिक्षण, सहकार आणि सभ्य राजकीय परंपरेसाठी ओळखल्या जाणाऱ्या राज्यात जर सार्वजनिक जीवनात दमदाटी, हिंसा आणि सत्तेचा धाक वाढत असेल, तर त्यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे आमदार डॉ. किरण लहामटे यांचे स्वीय सहाय्यक व चुलत भाऊ मुकुंद लहामटे यांनी एका तरुणाला भरबाजारात मारहाण केल्याचा आरोप असून, त्याचा कथित सीसीटीव्ही व्हिडिओही समोर आला आहे. या घटनेने पुन्हा एकदा राजकीय पदांशी संबंधित व्यक्तींच्या वर्तनाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. दोषी कोण आहे, हे तपास आणि कायदेशीर प्रक्रियेतून निश्चित होईल; मात्र अशा प्रत्येक घटनेत राजकीय संरक्षणाची भावना निर्माण होणे हेच लोकशाहीसाठी धोकादायक आहे. कोणत्याही पक्षाचा कार्यकर्ता किंवा नातेवाईक कायद्यापेक्षा मोठा नाही, हा संदेश कृतीतून दिला गेला पाहिजे. अन्यथा समाजात "सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या व्यक्तींना कायद्याची भीती उरलेली नाही" अशी भावना अधिक दृढ होत जाते.

शेवटी प्रश्न एका पक्षाचा किंवा एका व्यक्तीचा नाही. प्रश्न असा आहे की, महाराष्ट्राला कायद्याचे राज्य असलेला, सार्वजनिक सेवकांचा सन्मान करणारा आणि संविधानाला सर्वोच्च मानणारा समाज म्हणून पुढे न्यायचे आहे की सत्तेच्या छायेखाली गुंडशाही वाढू द्यायची आहे? या प्रश्नाचे उत्तर सरकार, विरोधक, न्यायव्यवस्था, माध्यमे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नागरिकांनी मिळून द्यावे लागेल. कारण लोकशाहीचे संरक्षण कोणताही पक्ष करत नाही; ते जागरूक नागरिक, सक्षम कायदा आणि निःपक्षपाती न्यायव्यवस्था करतात. हिंसेला राजकीय संरक्षण मिळणे थांबले, तरच सार्वजनिक जीवनातील वाढत्या गुंडशाहीवर प्रभावी अंकुश बसू शकेल.

# श्री ज्ञानेश्वरी पालखी सोहळा

## नेवासा-पंढरपूर दिंडीचे घोडेगावमध्ये जंगी स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शनिशिंगणापूर :** श्री क्षेत्र नेवासा येथून श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या आषाढी पायी पालखी दिंडी सोहळ्याचे शुक्रवारी (दि. १०) रोजी नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात जंगी स्वागत करण्यात आले. पालखीच्या स्वागतासाठी घोडेगावसह परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.



पालखीच्या आगमनाने संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले. घोडेगाव व परिसरातील विविध माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांनी ढोल-ताशा व लेझीम पथकांच्या आकर्षक सादरीकरणातून पालखी दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या पारंपरिक वादनाने आणि लेझीमच्या तालबद्ध सादरीकरणाने स्वागत सोहळ्याला विशेष रंगत आली. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे दर्शन घेऊन माऊलींच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले.

दिंडीतील वारकऱ्यांसाठी घोडेश्वरी माध्यमिक विद्यालय येथे मुळा सहकारी साखर कारखान्याचे संचालक वसंतराव सोनवणे व त्यांच्या परिवाराच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी सोनवणे परिवाराच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, नेवासा येथील हभप देविदास महाराज मस्के यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार अर्पण करून संतपूजन करण्यात आले.

घोडेगाव ग्रामपंचायतीच्या वतीने प्रशासक सवई व ग्रामसेवक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छता, आरोग्य सुविधा तसेच इतर आवश्यक सोयी-सुविधांची प्रभावी व्यवस्था करण्यात आली. ग्रामपंचायतीच्या नियोजनामुळे वारकऱ्यांची कोणतीही गैरसोय झाली नाही.

याप्रसंगी पंचायत समितीच्या माजी सभापती सुनीताताई गडाख, हर्षदाताई काकडे, मुळा एज्युकेशन संस्थेचे उपाध्यक्ष उदयन गडाख, माजी आमदार पांडुरंग अभंग, सोनई पोलीस ठाण्याचे मोरे साहेब, आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच विविध मान्यवरांनी पालखी सोहळ्यास भेट देऊन संत ज्ञानेश्वर महाराजांचे दर्शन घेतले.

पालखी सोहळ्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अहिल्यानगर पोलीस दलाच्या बॉम्ब शोधक व नाशक पथकाने संपूर्ण परिसराची तपासणी केली. या पथकात पीएसआय अंबादास हुलगे, दिनेश पळसकर, संजय येठेकर, अजय कदम, सुभाष पठारे, शरद वर्पे आणि युवराज पवार यांचा समावेश होता.

# विस्थापित व्यापाऱ्यांचे पुनर्वसन करा, अन्यथा इच्छामरणाची परवानगी द्या

**सुभाष त्रिभुवन | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरातील नेवासा, गोंधवणी व बेलापूर रोडवरील हटवलेल्या छोट्या-मोठ्या दुकानदारांचे तातडीने पुनर्वसन करावे, अन्यथा सरकारने इच्छामरणाची परवानगी द्यावी, अशी तीव्र मागणी श्रीरामपूर दुकानदार पुनर्वसन समितीचे अध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांनी केली आहे. या मागणीचे निवेदन नगराध्यक्ष करण ससाणे व मुख्याधिकारी मनोज



उकिर्डे यांना देण्यात आले. गेल्या १८ महिन्यांपूर्वी झालेल्या कारवाईमुळे अनेक व्यापारी रोजगारापासून वंचित असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. निवडणुकीदरम्यान आमदार हेमंत ओगले आणि नगराध्यक्ष ससाणे यांनी सत्तेत आल्यावर पुनर्वसनाचे आश्वासन दिले होते, मात्र ते अद्याप पाळले गेलेले नाही. कायमस्वरूपी पुनर्वसन होईपर्यंत व्यापाऱ्यांना तात्पुरती जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. याप्रसंगी अनेक विस्थापित व्यापारी उपस्थित होते.

# श्री सत्यसाईबाबांच्या रथासह चरण पादुकांचे देवगडहून संभाजीनगरकडे प्रस्थान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** प्रेमावतार भगवान श्री सत्यसाईबाबांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त प्रथमच आंध्र प्रदेशातील पुट्टपर्थी येथून आलेल्या श्री सत्यसाईबाबांच्या रथासह दिव्य चरण पादुकांचे श्रीक्षेत्र देवगड येथून छत्रपती संभाजीनगरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यातील साईभक्तांनी भावपूर्ण निरोप देत दर्शनाचा लाभ घेतला.

नगर शहरातून सुरू झालेल्या रथयात्रेने विविध मार्गांवरून प्रवास करत मिरी येथील सरदार मिरीकर वाड्यातील दत्त मंदिरात मुक्काम केला. येथे ॲड. गौरव मिरीकर व अमेय मिरीकर यांच्या हस्ते पादुकांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर रथयात्रा श्रीक्षेत्र देवगड येथे दाखल झाली. देवगड येथील श्री दत्त मंदिर संस्थानचे मठाधिपती हभप भास्करगिरी महाराज यांनी पादुकांचे पूजन करून श्री सत्यसाईबाबांच्या पुट्टपर्थी भेटीच्या आठवणींना उजाळा दिला.



रथयात्रेदरम्यान ठिकठिकाणी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेत भजन व नामस्मरणाचा आनंद लुटला. "मानव सेवा हीच ईश्वरी सेवा" या संदेशाचा प्रसार करत श्री सत्यसाई सेवा संघटनेने संपूर्ण जिल्ह्यात रथयात्रेचे उत्कृष्ट नियोजन केले. समारोपप्रसंगी जिल्हा प्रमुख अशोक कुरापाटी यांनी राज्याचे रथप्रमुख विकास लोळगे यांच्याकडे पुढील मार्गक्रमणासाठी रथाचा झेंडा सुपूर्द केला. यावेळी अहिल्यानगरच्या साईभक्तांनी भावुक वातावरणात रथयात्रेला निरोप दिला, तर छत्रपती संभाजीनगरमधील भाविकांनी उत्साहाने स्वागताची तयारी केली.

# माहेगाव देशमुख येथून पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील श्री अमृतेश्वर भजनी मंडळ व समस्त माहेगाव देशमुख ग्रामस्थ यांच्या सहकार्याने आयोजित श्री क्षेत्र माहेगाव देशमुख (साकुरी) ते श्री क्षेत्र पंढरपूर या आषाढी पायी दिंडीचे शुक्रवार (दि.१०) रोजी मोठ्या भक्तिमय वातावरणात विठोबा-रुखुमाईच्या जयघोषात पंढरपूरकडे प्रस्थान झाले. यावेळी माजी आ. अशोकराव काळे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येवून त्यांनी पालखीचे मनोभावे दर्शन घेतले व वारकऱ्यांना पंढरीच्या वारीसाठी शुभेच्छा दिल्या. टाळ-मृदंगाच्या गजरात, हरिनामाच्या अखंड जयघोषात आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या नाम घोषाने परिसर दुमदुमून गेला होता.



यावेळी बोलताना माजी आमदार अशोकराव काळे म्हणाले, 'आषाढी वारी ही केवळ पंढरपूरकडे जाणारी यात्रा नसून ती महाराष्ट्राच्या संत परंपरेचा, भक्तीचा, समतेचा आणि सामाजिक ऐक्याचा महान उत्सव आहे. वारकरी संप्रदायाने अनेक शतकांपासून समाजाला प्रेम, बंधुभाव, संयम आणि सेवाभावाची शिकवण दिली आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात वारीची परंपरा माणसाला अध्यात्माशी जोडण्याचे आणि समाजात सकारात्मक विचार रुजविण्याचे महत्वपूर्ण कार्य करत आहे. माहेगाव देशमुख येथील श्री अमृतेश्वर भजनी मंडळ आणि ग्रामस्थांनी ही परंपरा जपण्यासाठी घेतलेले परिश्रम कौतुकास्पद आहेत. सर्व वारकऱ्यांची वारी सुखरूप, मंगलमय आणि निर्विघ्न पार पडो, तसेच पांडुरंगाच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि समाधान लाभो, व भरपूर पाऊस पडून बळीराजा सुखी होवो अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या.

या प्रसंगी श्री अमृतेश्वर भजनी मंडळ, वारकरी तसेच माहेगाव देशमुख परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तिमय वातावरणात विठोबा रखुमाई च्या जयघोषात पायी दिंडीने पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केले.

# कंगोणीत कृषिकन्यांकडून बोर्डो पेस्ट तयार करण्याचे प्रात्यक्षिक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शनिशिंगणापूर :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय, सोनई येथील अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींनी ग्रामीण कृषी जागरूकता व कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कंगोणी ग्रामपंचायत कार्यालय परिसरात बोर्डो पेस्ट तयार करण्याचे शास्त्रोक्त प्रात्यक्षिक सादर केले. शेतकऱ्यांना फळबागांसह विविध पिकांवरील बुरशीजन्य रोगांचे प्रभावी व्यवस्थापन करता यावे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. प्रात्यक्षिकावेळी कृषिकन्यांनी बोर्डो पेस्ट तयार करण्यासाठी लागणारे कॉपर सल्फेट, चुना आणि पाणी यांचे योग्य प्रमाण, प्रत्येक घटकाचे महत्त्व तसेच मिश्रण तयार करण्याची शास्त्रीय पद्धत प्रत्यक्ष करून दाखवली. मिश्रण तयार करताना घ्यावयाची काळजी, योग्य क्रमाने घटक मिसळण्याची प्रक्रिया आणि सुरक्षित वापराबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी आंबा, डाळिंब, लिंबूवर्गीय तसेच इतर फळपिकांमध्ये आढळणारे गमोसिस, कँकर, फांद्या वाळणे आणि खोडावरील बुरशीजन्य संसर्ग यांसारख्या रोगांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी बोर्डो पेस्टचा प्रभावी वापर कसा करावा, याची माहिती देण्यात आली. शिफारशीनुसार वेळेवर वापर केल्यास पिकांचे संरक्षण होऊन उत्पादन वाढण्यास मदत होत असल्याचे कृषिकन्यांनी सांगितले. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, कार्यक्रम समन्वयक प्रा. अनुप दरंदले, कार्यक्रम अधिकारी प्रा. दिशा चव्हाण, डॉ. संतोष चौगुले, प्रा. नरेंद्र दहातोंडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रात्यक्षिकास शेतकरी व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अशा शास्त्राधारित उपक्रमांचे स्वागत केले.

# पुणतांबा ग्रामपंचायत कारभार 'रामभरोसे' विकासकामे ठप्प झाल्याने 'मोर्चा' काढण्याचा भूषण वाघ यांचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** राहाता तालुक्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या आणि सर्वात मोठ्या असलेल्या पुणतांबा ग्रामपंचायतीमध्ये गेल्या काही महिन्यांपासून पदाधिकारी उपस्थित राहत नसल्याने ग्रामपंचायतीचा कारभार पूर्णपणे 'रामभरोसे' झाला आहे. यामुळे गावातील विकासकामे ठप्प झाली असून, मासिक बैठकीत सदस्यांनी मंजूर केलेले ठराव तातडीने अंमलात आणून कामे सुरू करावीत, अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयावर तीव्र मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा जनसेवा मंडळाचे ग्रामपंचायत सदस्य भूषण वाघ यांनी दिला आहे.

सध्या ही ग्रामपंचायत आमदार विवेक कोल्हे गटाच्या विकास आघाडीच्या ताब्यात आहे. सत्ताधाऱ्यांचा अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे. सुरुवातीच्या काळात विकासकामांवर आणि ग्रामपंचायतीच्या कामकाजावर सत्ताधारी गटाचे नेते व कार्यकर्त्यांचे चांगले लक्ष होते. मात्र, गेल्या वर्ष-दीड वर्षापासून ग्रामपंचायतीच्या कारभाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने गावाचा विकास रखडला आहे.



सरपंच हे केवळ मासिक बैठकीपुरतेच हजर राहतात, तर उपसरपंच गेल्या वर्षभरापासून ग्रामपंचायतीत फिरकलेलेच नाहीत. पदाधिकाऱ्यांच्या या अनुपस्थितीमुळे ग्रामपंचायतीचे कर्मचारीही अनेकदा दांड्या मारतात. परिणामी, सामान्य नागरिकांना अगदी किरकोळ कामांसाठीही ग्रामपंचायतीचे अनेक हेलपाटे मारावे लागत आहेत. या संदर्भात ग्रामविकास अधिकाऱ्यांकडे नागरिक आणि सदस्यांनी विचारणा केली असता, ते योग्य उत्तरे देत नाहीत. या मनमानी कारभारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे, असा आरोप वाघ यांनी केला.

ग्रामपंचायतीकडे पुरेसा निधी उपलब्ध असतानाही गावातील अंतर्गत रस्ते दुरुस्ती व अन्य विकासकामे केवळ प्रशासकीय अनास्थेमुळे गेल्या वर्षभरापासून रखडलेली आहेत. सदस्य वारंवार बैठकीत ही कामे सुचवत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. ग्रामपंचायतीच्या या चुकीच्या आणि ढिसाळ कारभाराविरोधात जनसेवा मंडळाचे सदस्य रामचंद्र पवार यांनी जिल्हाधिकारी, गटविकास अधिकारी यांच्यासह न्यायालयातही तक्रार दाखल केली आहे. तरीही प्रशासनात कोणतीही सुधारणा झालेली नाही.

'जलजीवन मिशन' अंतर्गत वाड्या-वस्त्यांवरील पाणीपुरवठा योजना आणि जलशुद्धीकरण यंत्रणेचे काम गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे, मात्र ते अद्यापही अपूर्णच आहे. हे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून केले जात असले, तरी त्यावर स्थानिक ग्रामपंचायतीचे देखरेख व नियंत्रण असणे आवश्यक होते. सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीदरम्यान अनेक आश्वासने दिली होती, मात्र ती सर्व आश्वासने फोल ठरल्याचा आरोप भूषण वाघ यांनी केला आहे. जर तातडीने ठराव केलेली विकासकामे सुरू झाली नाहीत, तर ग्रामस्थांना सोबत घेऊन आंदोलन छेडले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.दीड महिन्यापूर्वी उपसरपंच निकिता जाधव यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असल्याची चर्चा आहे. मात्र, हा राजीनामा विहित नमुन्यात ग्रामसेवकांकडे सादर करण्यात आलेला नसल्याने तो अद्याप मंजूर झालेला नाही. नवीन उपसरपंच कोण होणार? यावरून सत्ताधारी आणि विरोधी गटात चर्चा रंगत असली, तरी तांत्रिकदृष्ट्या राजीनामा मंजूर नसल्याने हा केवळ एक 'राजकीय स्टंट' किंवा 'फार्स' आहे का? असा जाहीर प्रश्न भूषण वाघ यांनी उपस्थित केला आहे.

# उपप्राचार्य मोटे यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान समाजाला दिशा देणारे : सुनिताताई गडाख

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी यशवंतराव गडाख यांची मुळा एज्युकेशन सोसायटी महत्वाची भूमिका बजावत आहे. यामध्ये शिक्षकांचे अध्यापन व उपक्रम विद्यार्थ्यांचे जीवन घडवितात असे प्रतिपादन पंचायत समितीच्या माजी सभापती सुनिताताई गडाख यांनी ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या उपप्राचार्य राधाताई मोटे यांच्या सेवापूर्ती समारंभ प्रसंगी व्यक्त केले. शिक्षण क्षेत्रात दिलेले प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदान समाजाला नेहमीच दिशा देणारी ठरेल असे गौरवोद्गार माजी सभापती सुनीताताई गडाख यांनी काढले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य रघुनाथ आगळे होते. याप्रसंगी एज्युकेशन सोसायटीचे सचिव उत्तमराव लोंढे, सहसचिव डॉ. विनायक देशमुख, प्रशासन अधिकारी जालिंदर घुले, योजना अधिकारी डॉ. संदीप खेडकर, माझी प्राचार्य गणपतराव चव्हाण आणि विविध मान्यवर उपस्थित होते.



आपल्या भाषणात त्या पुढे म्हणाल्या, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवन करून त्यांना माणूस म्हणून उभे करावे. उत्तम अध्यापना बरोबरच विद्यार्थ्यांचा नैतिक विकास आणि मुलांचा आत्मविश्वास हा शिक्षकांच्या कृतीतून वाढत असतो असे प्रतिपादन त्यांनी केले.

उपप्राचार्य राधाताई मोटे म्हणाल्या, संस्थेचे संस्थापक यशवंतराव गडाख यांच्या दूरदृष्टीतून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी ही शैक्षणिक संस्था उभी राहीली आणि माझ्यासारख्या अनेक ग्रामीण मुलांची आयुष्यक्रमाची दिशा उंचावली.

१९८२ ते २०२६ या काळात मी मुळा एज्युकेशन संस्था,पालक आजी-माजी विद्यार्थी प्राध्यापक यांच्याशी जोडले गेले. संस्थेने विविध पदावर काम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी ऋणनिर्देश व्यक्त केले.

या भूमीच्या परिस स्पर्शाने अनेकांचे जीवन प्रकाशमान झाली याबद्दल त्यांनी संस्थेचे अध्यक्ष प्रशांतभाऊ गडाख,उपाध्यक्ष उदयन दादा गडाख यांचे प्रति कृतज्ञता भाव व्यक्त केले. संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी यावेळी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

ाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण घनवट, दिलीप मोटे, ॲड. कृष्णा मोटे, बाळासाहेब मोटे, ॲड. कल्याण पिसाळ,प्रकाश मोटे, राजेंद्र मोटे, दत्तात्रय मोटे गुरुजी, संजय खर्डे, ॲड. वसंतराव नवले, बाळासाहेब नवले, प्रा. वसंतराव सपकाळ, सरकारी वकील अॅड., चव्हाण,वरखडे भाऊसाहेब,डॉ. भाऊसाहेब दहिफळे प्रा. रामनाथ मडके, कुमार गणगे, राजेंद्र गणगे, पोपटराव आहेर,विष्णूपंत उकिर्डे,निलेश भोसले,गोरक्षनाथ साठे श्रीरामपूर नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कानिफ उकिर्डे, विजयाताई कोल्हे - शिंदे , संभाजीनगरचे उद्योजक संजय वहाडणे,प्राचार्य जालिंदर दराडे , सामाजिक कार्यकर्ते दिनेश निमसे प्राध्यापक आणि नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा गोवर्धन रोडे यांनी तर प्रा. देविदास साळुंके यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.डॉ संजय सुकाळकर यांनी आभार मानले .

# प्रवरा कन्या विद्यामंदीरच्या १८ कन्यांची जलतरण स्पर्धेत डंका आता लढाई राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर:**लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील सैनिक स्कूल येथे झालेल्या जिल्हास्तरीय चाचणी स्पर्धेत प्रवरा कन्या विद्या मंदीरच्या मुलींनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तब्बल १८ खेळाडूंची गुणवत्तेच्या जोरावर निवड झाली. या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील २५ शाळांमधून सुमारे तीनशे जलतरणपटूंनी सहभाग घेतला. विविध वयोगटातील जलतरणातील विविध क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंनी सहभाग घेऊन उत्कृष्ट जलतरण कौशल्याचे प्रदर्शन केले.अशी माहीती प्राचार्य विद्या घोरपडे यांनी दिली.प्रवरा कन्या विद्या मंदीरच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू असे ऋतुजा जगताप,आरती क्षीरसागर,साक्षी पाटील,सिद्धी सोंगाडे ,सृष्टी जाचक,भक्ती वाघ,सरगम सिक्करवार,ईश्वरी पानसरे ,श्रावणी घोगरे ,गायत्री तोरवणे, अन्वी शिंगारे,अमृता वाणी ,रोशनी माने,अनन्या बळी,अनुश्री पांढरे,तेजल वाकचौरे, स्वरा कोकणे, राजनंदिनी शिंदे आणि श्रुती चेचरे इत्यादी विद्यार्थ्यांची राज्य पातळीवर निवड झाली. नाशिक येथे या स्पर्धा होणार आहेत. त्यांना क्रिडा शिक्षीका सुचित्रा तांबे यांचे मार्गदर्शन लाभले.या सर्व खेळाडूंनी फ्रीस्टाइल ,ब्रेस्टस्ट्रोक , बॅकस्ट्रोक ,बटरफ्लाय या विविध प्रकारामध्ये उल्लेखनीय कामगिरी करून नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत स्थान निश्चित केले आहे. निवड झालेल्या खेळाडूंना प्रवरा पब्लिक स्कूलचे प्राचार्य डॉ. बी बी अंबाडे, पर्यवेक्षिका एम. एस. जगधने, शुभांगी रत्नपारखी, क्रीडा संचालक अबजल पटेल, क्रीडा शिक्षक दीपक जाधव व जलतरण प्रशिक्षका योगिता तनपुरे यांचे मार्गदर्शन लाभले.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# जिल्हा परिषद शाळांच्या गणवेश वाटपावर प्रश्नचिन्ह !

## निकृष्ट दर्जाच्या चौकशीची मागणी । 'लॅबसाठी एक, विद्यार्थ्यांच्या अंगावर दुसरे कापड' पालकांचा आरोप



**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : जिल्हा परिषद शाळांमध्ये शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत गणवेशांचे वाटप करण्यात आले आहे. मात्र अनेक शाळांमध्ये पुरविण्यात आलेल्या गणवेशाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असून, निकृष्ट दर्जाचे कापड वापरून शासनाची व शाळांची फसवणूक झाल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र समितीमार्फत निष्पक्ष चौकशी करून विद्यार्थ्यांच्या अंगावरील गणवेशाची प्रयोगशाळेत (लॅब) तपासणी करण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार गणवेशासाठी ३० टक्के कॉटन व ७० टक्के पॉलिस्टर मिश्रित कापड वापरणे बंधनकारक असल्याचे सांगितले जाते. त्यासाठी प्रयोगशाळेचा अहवाल (लॅब टेस्ट) सादर करण्याचीही अट आहे.

मात्र काही ठिकाणी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा,पॉलिस्टरचे प्रमाण अधिक असलेला कपडा देण्यात आला असून, लॅब टेस्टसाठी मात्र वेगळ्या दर्जाचे कापड पाठवून शासनाची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप पालकांनी केला आहे. गणवेश सुमारे २०० ते २२५ रुपयांत खरेदी करण्यात आला.प्रत्यक्षात हलक्या दर्जाचे कापड वापरल्यामुळे एका गणवेशामागे सुमारे ७५ रुपयांचा फरक कुठे गेला, याची चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणीही होत आहे. गटशिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुखांमार्फत काही शाळांमध्ये गणवेश तपासणी मोहीम राबविण्यात आली आहे. मात्र ही तपासणी केवळ कागदोपत्री मर्यादित राहिल्याचा आरोप पालकांकडून करण्यात येत आहे.कागदी घोडे नाचवून केंद्रप्रमुखांनी सर्व काही अलबेल असल्याचे कागदी घोड्यातून दाखवले आहे.

प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या अंगावरील गणवेशाचे नमुने घेऊन लॅब टेस्ट केल्यास संपूर्ण प्रकार उघडकीस येईल, असे पालकांचे म्हणणे आहे. काही ठिकाणी केवळ स्काऊट ड्रेसची तपासणी झाल्याची माहिती समोर येत असून, नियमित वापरातील गणवेशाची तपासणी अद्याप झालेली नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे स्काऊट ड्रेसबरोबरच विद्यार्थ्यांच्या नियमित गणवेशाचाही नमुना तपासणीसाठी घेण्यात यावा, अशी मागणी पालकांनी केली आहे. निकृष्ट दर्जाचे गणवेश पुरवणाऱ्या व्यापाऱ्यांचे देयक तातडीने रोखण्यात यावे. स्वतंत्र समितीमार्फत दोन्ही प्रकारच्या गणवेशांची गुणवत्ता तपासल्यानंतरच संबंधित व्यापाऱ्यांना पैसे अदा करावेत. दोषी आढळल्यास त्यांच्याविरुद्ध फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणीही पालकांनी केली आहे. अनेक शाळांनी रेडीमेड गणवेश घेतले असून केवळ शासनाची दिशाभूल करण्यासाठी बचत गटांकडून शिलाईचे बिल घेतले आहेत.

गणवेशाची शिलाई चेक केल्यास प्रत्येक गणवेशाची निकृष्ट दर्जाची शिलाई असल्याचे पालकांनी सांगितले.बचत गटाकडून कोणत्याही प्रकारचे गणवेश शिलाई केलेले नसताना केवळ शासनाचा आदेशाचा प्रमाणे कारवाई केल्याचे कागदपत्रातून दाखवून दिले आहे. दरम्यान, शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लक्ष्य केले जाईल, या भीतीने अनेक पालक उघडपणे तक्रार करण्यास धजावत नसल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे पालकांना गोपनीयरीत्या तक्रार करता यावी यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने गणवेश तक्रारींसाठी स्वतंत्र हेल्पलाईन किंवा टोल-फ्री क्रमांक सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी स्वतः लक्ष घालून कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधित शाळांमध्ये अचानक तपासणी करावी.

विद्यार्थ्यांच्या अंगावरील गणवेशाचे नमुने जप्त करून मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत त्यांची गुणवत्ता तपासावी. दोषी व्यापारी व संबंधितांवर कठोर कारवाई करून शासनाचा निधी व विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण करावे, अशी मागणी पालक वर्गातून करण्यात येत आहे.

### शिक्षणाधिकारी नॉट रिचेबल

निकृष्ट दर्जाचे गणवेश पुरवठा करुन,लॅब टेस्टसाठी वेगळा कपडा पाठविला जात असल्या बातची माहिती घेण्यासाठी दिवसभरात अनेक वेळा भ्रमणभाषावर संपर्क साधला असता शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांचा भ्रमण भाष बंद होता.

### गरीबांचे मुले, म्हणून निकृष्ट दर्जाचे गणवेश का ?

सध्या जिल्हा परीषद शाळेकडे गरीबांची शाळा म्हणून पाहिले जाते. सधन पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शिकवत असल्याने जिल्हा परीषद शाळा म्हणजे गरीबांची शाळा असा समज आता तयार होवू लागला आहे.या शाळेत गरीबांची मुले शिकतात म्हणून निकृष्ठ दर्जाचे गणवेश दिले जातात का? असा प्रश्न सर्वसामान्य पालकातून विचारला जात आहे.

---

## द•ख•ल

### चांदा येथून सलग तीन दिवस तीन दिंड्यांचे पंढरपूरकडे भक्तिमय प्रस्थान

**चांदा** : नेवासा तालुक्यातील चांदा येथून आषाढी वारीनिमित्त सलग तीन दिवस तीन दिंड्यांचे पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान होत आहे.

गावात वारकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून दिंड्यांच्या स्वागत व प्रस्थानाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. शनिवार (दि. ११) रोजी श्री दत्त साधक आश्रमातील वैकुंठवासी ह.भ.प. रोहिदास महाराज चांदेकर यांच्या कृपाशीर्वादाने पहिली दिंडी कडगाव, घाटशिरस, आल्हणवाडी, जामगाव, कवडगाव, करमाळा, शेलगाव, निंभोरे, टेंभुर्णी व करकंभ मार्गे पंढरपूरकडे रवाना होणार आहे. रविवार (दि. १२) रोजी वैकुंठवासी ह.भ.प. श्रीकृष्णदास लोहिया महाराज यांच्या दिंडीचे श्रीराम मंदिरातून ह.भ.प. शिवानंद महाराज दहातोंडे, देविदास महाराज आडभाई व चंद्रकांत महाराज दहातोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्थान होईल. तर सोमवार (दि. १३) रोजी सोमेश्वर मंदिरातून ह.भ.प. पंडीत महाराज भुतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तिसरी दिंडी विविध गावांमार्गे पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहे. या तिन्ही दिंड्यांमध्ये मोठ्या संख्येने वारकरी सहभागी होत असून विठ्ठलनामाच्या गजरात चांदा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे.

### शिवा ट्रस्ट'तर्फे रक्तदान व वृक्षारोपण शिबीर




**श्रीरामपूर** : 'शिवा ट्रस्ट' शैक्षणिक या महाविद्यालयात शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, वडाळा महादेव येथे भव्य रक्तदान शिबीर व वृक्षारोपण उपक्रम उत्साहात पार पडला. आयुष मंत्रालय व विविध शासकीय आयोगांच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना आणि कम्युनिटी मेडिसिन विभागाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार होते, तर उद्घाटन संचालक दिलीप पवार यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजाभाऊ चव्हाण उपस्थित होते.

दिलीप पवार यांनी भाषणातून विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना रक्तदानाचे महत्त्व पटवून दिले. या शिबिरात एकूण ६१ दात्यांनी रक्तदान केले. यानंतर महाविद्यालय परिसरात वृक्षदिंडी काढून पर्यावरण संवर्धनासाठी विविध वृक्षांचे रोपण करण्यात आले. प्राचार्य डॉ. रिझवान अहमद यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कार्यक्रमात संकुलातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, बी.एस.पी. रक्तपेढीचे कर्मचारी आणि सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासकीय अधिकारी श्रीकांत पवार यांनी आभार मानले.

### मंजूर कर्ज द्या, नाहीतर उताऱ्यावरील बोजा हटवा; आ. काळेंची विधिमंडळात मागणी



**कोळपेवाडी** : विविध सरकारी महामंडळांकडून ज्यांना कर्ज मंजूर झाले मात्र कर्ज वितरीत करण्यापूर्वीच त्यांच्या उता-यावर बोजा चढविण्यात आला. त्यामुळे त्यातील शेतक-यांना पिक कर्ज मिळेनासे झाले. एक तर मंजूर कर्ज त्वरीत द्या किंवा उता-यावरील बोजा तरी कमी करा.

अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी आज विधानसभेत सरकारकडे केले. ते म्हणाले, राज्यातील सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी आणि गरजू नागरिकांना स्वयंरोजगार तसेच शैक्षणिक कारणासाठी विविध योजनांतून कर्ज मंजूर झाले. एक लाख रूपयांपर्यंत मिळणा-या या कर्जात वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ यांसह इतर विविध महामंडळांचा समावेश आहे.

या महामंडळांच्या माध्यमातून कोपरगाव मतदार संघातील ब-याच शेतकऱ्यांना तसेच अन्य पात्र कर्जदारांना कर्ज मंजूर झाले. मात्र दोन वर्ष होवूनही कर्ज वाटप झाले नाही. कर्जदारांच्या उताऱ्यावर बोजा मात्र चढला. त्यामुळे त्यांना सोसायटी किंवा बँकेकडून पिक कर्ज देखील मिळेनासे झाले. हि मंडळी दुहेरी अडचणीत सापडली. आता सरकारने या कर्जदारांना मंजूर कर्जाचे वाटप करावे नाहीतर त्यांच्या उताऱ्यावरील बोजा कमी करावा.

---

## निळवंडे लाभक्षेत्रात २४ हेक्टरला मिळणार १ कोटी लिटर पाणी : डॉ. सुजय विखे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : निळवंडे लाभक्षेत्रातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचवण्यासाठी स्वतंत्र 'पाणी वाटप संस्था' स्थापन केली जाईल, अशी घोषणा भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी आश्वी बुद्रुक येथील बैठकीत केली.

या योजनेअंतर्गत पाईपद्वारे प्रति आवर्तन २४ हेक्टरसाठी तब्बल एक कोटी लिटर पाणी पुरवले जाईल.

ऑटोमेशन योजना रद्द करून वाचलेले ६० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या शेततळ्यांच्या प्लास्टिक कागदासाठी (६० हजार रुपये अनुदान) वापरले जातील. तसेच प्रवरा कालव्यांच्या दुरुस्तीसाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी १५० कोटी रुपये मंजूर केले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

याशिवाय, निमगावजाळी येथील 'बिबट सफारी'साठी १५ कोटी मंजूर झाले असून निझर्णेश्वर येथे प्राणी संग्रहालय उभारण्याचा प्रस्ताव आहे, ज्यामुळे रोजगार वाढेल. डॉ. विखे यांनी कार्यकर्त्यांना मतदार यादी पुनिरीक्षण काम अचूक करण्याचे व शासकीय विकासकामे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. या बैठकीला भाजपचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ. काळे यांच्या प्रयत्नातून नपावाडी-शिर्डी विद्यार्थिनींसाठी विशेष बससेवा सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना सुरक्षित, नियमित आणि वेळेत शाळेत पोहोचता यावे या उद्देशाने आमदार आशुतोष काळे यांच्या विशेष प्रयत्नातून तसेच अशोक धनवटे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे नपावाडी ते साईबाबा कन्या विद्यालय, शिर्डी या मार्गावर विद्यार्थिनींसाठी विशेष एसटी बससेवा सुरू करण्यात आली आहे. या बससेवेचा शुभारंभ शुक्रवारी (दि. १०) स्थानिक सामाजिक कार्यकर्ते सुभाष वहाडणे यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला. यावेळी एसटी चालक-वाहकांचा सत्कार करून हिरवा झेंडा दाखवत बस मार्गस्थ करण्यात आली.

नपावाडीसह परिसरातील अनेक गावांतील विद्यार्थिनींना शिक्षणासाठी दररोज शिर्डी येथे ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब पालकांनी आमदार आशुतोष काळे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने दखल घेत पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र व वेळेवर बससेवा सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या मागणीसाठी अशोक धनवटे यांनी सातत्याने एसटी महामंडळाकडे पाठपुरावा केला. विद्यार्थिनींसाठी ही बससेवा सुरू व्हावी यासाठी अशोकराव धनवटे, बाबासाहेब उगले, ज्ञानदेव वहाडणे, राजूनाना धनवटे, दादापाटील धनवटे, मधुकर



धनवटे, प्रताप धनवटे, दादापाटील उगले, नवनाथ उगले, नवनाथ धनवटे, रामनाथ वहाडणे, संभाजी वहाडणे, मधुकर वहाडणे, पोपट थोरात, पोपट धनवटे, संदीप वहाडणे, सतीश उगले, सीताराम धनवटे, महेश वहाडणे, धनंजय उगले, किरण उगले, सचिन उगले, बाळासाहेब धनवटे, दगडू धनवटे, विठ्ठल धनवटे, निलेश वहाडणे, संतोष धनवटे आणि रोहिदास यांनी विशेष प्रयत्न केले.

तसेच कोपरगाव आगारप्रमुख महेश बनकर, बस चालक बी. एम. गर्जे, वाहक एस. एम. थोरात, साईबाबा कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती जहाँआरा मिरजकर आणि शिक्षक सुजय बाबर यांचेही सहकार्य लाभले. विद्यार्थिनींच्या शिक्षणाला चालना मिळावी आणि त्यांच्या सुरक्षित प्रवासाची चिंता दूर व्हावी या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या विशेष बससेवेचे पालक व नागरिकांनी स्वागत केले असून पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, आमदार आशुतोष काळे, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि अशोक धनवटे यांचे आभार व्यक्त केले.

---

# आरोग्य, पर्यावरण अन् भक्तीचा संगम

## 'नाशिक-पंढरपूर' सायकल वारीचे लोणीत जल्लोषात स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : चला सायकल चालवू या, आरोग्य जपूया आणि पर्यावरणाचे रक्षण करूया हा सामाजिक संदेश देत रॉयल रायडर्स नाशिक सायकलिंग क्लबतर्फे आयोजित 'नाशिक ते पंढरपूर' सायकल वारी शुक्रवारी उत्साहात लोणी येथे दाखल झाली. विठ्ठल नामाच्या गजरात, सायकलींच्या घंटानादात आणि भक्तिमय वातावरणात ग्रामस्थांनी व स्थानिक कार्यकर्त्यांनी वारकऱ्यांचे जल्लोषात स्वागत केले.

सहाव्या वर्षात पदार्पण केलेल्या या सायकल वारीत तब्बल २३७ सायकलस्वार सहभागी झाले असून, त्यामध्ये ३० महिला सायकलस्वारांसह अनेक ज्येष्ठ नागरिकांचाही उल्लेखनीय सहभाग आहे. आरोग्य संवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि अध्यात्म यांचा अनोखा संगम साधणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. लोणी पोलीस ठाण्याच्या प्रांगणात सामाजिक कार्यकर्ते दीपक धावणे यांच्या पुढाकाराने सर्व सायकलस्वारांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांनी सायकलवारीचे स्वागत करून सहभागी सायकलस्वारांना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी रॉयल रायडर्स क्लबचे प्रमुख डॉ. आबा पाटील म्हणाले, आजच्या धकाधकीच्या जीवनात निरोगी राहण्यासाठी सायकलिंगसारख्या उपक्रमांची गरज आहे. वर्षातून एकदा होणारी ही सायकल



वारी शारीरिक तंदुरुस्तीबरोबर मानसिक समाधानही देते. विठ्ठलभक्ती जोपासत प्रदूषणमुक्त पर्यावरणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत, सायकल वारीतून समाजप्रबोधन, आरोग्य आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडत असून, अशा उपक्रमांची आजच्या काळात नितांत आवश्यकता आहे, असे मत व्यक्त केले.

ही सायकल वारी तीन टप्प्यांत पूर्ण होणार असून, पहिल्या दिवशी नाशिक-लोणी-राहुरी-शिंगवे-देहरे मार्गे अहिल्यानगर येथे मुक्काम, दुसऱ्या दिवशी अहिल्यानगर-टेंभुर्णी आणि तिसऱ्या दिवशी टेंभुर्णी-पंढरपूर असा प्रवास करण्यात येणार आहे. यावेळी डॉ. आबा पाटील यांच्या हस्ते पोलीस निरीक्षक युवराज आठरे आणि सामाजिक कार्यकर्ते दीपक धावणे यांचा विठू माऊलीची प्रतिमा असलेले स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

स्वागत सोहळ्यास नंदू शेठ राठी, रामनाथ आहेर, बंडू लगड, महेंद्र शेठ, कृष्णा कुलथे, गौरव पुलाटे यांच्यासह अनेक सायकलस्वार, स्थानिक कार्यकर्ते आणि पोलीस कर्मचारी उपस्थित होते. विठ्ठलाच्या जयघोषात आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा स्वागत सोहळा संपन्न झाला.

---

### जाहीर नोटीस

ॲडव्होकेट श्री. एस.ए.पांडे,
निशाणी नं. ५
दिनांक ०९/०७/२०२६
नेमलेली ता. १०/०८/२०२६,

श्रीरामपुर येथील मे. ४ थे सह दिवाणी न्यायाधिश साहेब क, स्तर यांचे कोर्टात......
वारस चौकशी अर्ज नं.४५/२०२६

१. श्री.अजय कल्याणमल चुडीवाल, वय ५६ वर्ष, धंदा व्यापार,
२. श्री. संजय कल्याणमल चुडीवाल, वय ६४ वर्ष, धंदा व्यापार, दोघे रा. सन्मीत्र हौसिंग सोसायटी, वार्ड नंबर ७, श्रीरामपुर, ता श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर मो. ९४२३७१३७६९
३. सौ. कल्पना अनिल सेठी, वय ६० वर्ष, धंदा घरकाम, रा. एएस क्लब शेजारी, छ. संभाजीनगर, ता.जि. छ. संभाजीनगर

**अर्जदार**
विरूध्द
कोणी नाही-**सावाला**
अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे चाप्टर ८ प्रमाणे
याकामी अर्जदारांचा अर्ज असा की,

१. अर्जदार नं १ ते ३ यांचे वडील कल्याणमल भाऊलाल चुडीवाल है दिनांक १९/०१/२०२४ रोजी व आई शांताबाई कल्याणमल चुडीवाल या दिनांक ०३/०६/२०२३ रोजी श्रीरामपुर येथे मयत झालेले आहेत.

२. मयत कल्याणमल चुडीवाल व शांताबाई चुडीवाल यांना अर्जदार यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत कल्याणमल चुडीवाल व मयत शांताबाई कल्याणमल चुडीवाल यांच नावावर स्थावर व जंगम मिळकती आहेत. त्याचा तपशिल अर्जदारांनी दाखल केलेल्या मुळ अर्जात नमुद केले प्रमाणे आहे. सदर मिळकती पैकी जंगम मिळकतीचे रक्कम रूपये ६६,७८,०००.२९ इतके एकुण मुल्य आहे

३. मुळ अर्जात नमुद केले प्रमाणे कल्याणमल चुडीवाल व शांताबाई चुडीवाल यांचे नावे जंगम व स्थावर मिळकती असुन ते मयत झाल्याने वर नमुद संस्थांकडे मिळकत नावावर होवुन मिळणेकामी विनंती केली असता व रक्कमेची मागणी केली असता त्यांनी अर्जदारांना मा. कोर्टा कडुन वारस प्रमाणपत्र आणणेकामी तोंडी कळविले आहे. त्यामुळे अर्जदारांना प्रस्तुतचा अर्ज वर नमुद मिळकतीसाठी नमुद अर्जदार हे मयत कल्याणमल भाऊलाल चुडीवाल व शांताबाई कल्याणमल चुडीवाल यांचे कायदेशिर वारस आहेत तसेच अर्जदार नं १ यचि नावाने वारस प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा वारस चौकशी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहीतगार वकिलांकरवी ४ थे सह दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर श्रीरामपुर या मे. कोर्टात हजर होवुन योग्य त्या पुराव्यानिशी हरकत नोंदवावी अन्यथा पुढील आदेश केले जातील.

आज दि. माहे जुलै सन २०२६ रोजी माझे सहीनिशी व मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**बेंच क्लार्क, ४ थे सह दिवाणी न्यायालय क. स्तर श्रीरामपुर** (शिक्का) **हुकूमावरुन सहाय्यक अधिक्षक, मह दिवाणी न्यायालय क. स्तर श्रीरामपुर**

### जाहिर नोटीस

निशाणी क्र. ०९
दिनांक : १०/७/२०२६
नेमलेली तारीख ०१/०८/२०२६

ॲड. बी. आर. भुसारी
नेवासा कोर्ट

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब सि.डी. यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं.

**अर्जदार**-वेरुणिका जोसेफ लोंढे, वगैरे
**सा.वाले**-दिपाली संजय साळवी, वगैरे
**मयत**-पावलस ऊर्फ रमेश बाबुराव साळवी, मृत्यु दि. २४/०१/१९७८

अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारस सर्टिफिकेट मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जदार नं.१, २ व ४ हया सख्या बहिणी असुन अर्जदार नं.३ व ५ हे त्यांचे सख्खे भाऊ आहेत. अर्जदार नं.१ ते ५ यांना आणखी एक भाऊ नामे संजय पावलस साळवी हा होता. संजय हा दि. १८/०१/२०१६ रोजी मयत झालेला असुन सा. वाले नं.१ ही मयत संजय याची पत्नी असुन सा. वाले नं.२ व ३ मयत संजय याची मुले आहेत. अर्जदार नं.३ ते ५ यांनी त्यांच्या बहिणी म्हणजेच अर्जदार नं.१ व २ यांना मिळकत मौजे सोनई, (नविन) ता. नेवासा, जि. अहमदनगर येथील गट नंबर ११३६/२ पैकी क्षेत्र ० हे ६५ आर आकार १ रु ४० पैसे या मिळकती बाबत दि. ०६/१२/२०२१ रोजी कधीही रद्दबादल न होणारे कुल मुख्यत्यारपत्र दुय्यम निबंधक कार्यालय हवेली क्रमांक १७ यांच्याकडे दस्त नंबर १३२२६/२०२१ अन्वये कुल मुख्यत्यार पत्र रजिस्टर्ड दस्त नोंदवुन दिलेला आहे. अर्जदार यांचे वडिल पावलस ऊर्फ रमेश बाबुराव साळवी यांना मिळकत मौजे सोनई, (नविन) ता. नेवासा, जि. अहमदनगर येथील गट नंबर ११३६/२ पैकी क्षेत्र ० हे ६५ आर आकार १ रु ४० पैसे हि मिळकत महाराष्ट्र शासनाकडून मिळालेली होती व आहे. सदरची मिळकत हि भोगवटा वर्ग-२ ची आहे. अर्जदारांचे वडिल पावलस बाबुराव साळवी हे दि.२४/०१/१९७८ रोजी मयत झालेले आहे. त्यांना अर्जदार नं.१ ते ५ व मयत संजय पावलस साळवी कायदेशिर वारस होते. परंतु अर्जदार हे बाहेरगावी पुणे राहत असल्याचा गैरफायदा घेवुन त्यांचा भाऊ नामे संजय पावलस ऊर्फ रमेश साळवी याने वर नमुद मिळकत गट नंबर ११३६/२ पैकी क्षेत्र ० हे ६५ आर या मिळकतीस कामगार तलाठी व मंडळ अधिकारी यांना हाताशी धरुन त्यांच्याशी संगनमत करुन फेरफार नं.२७३५९ अन्वये संजय पावलस साळवी याची फक्त एकटयाचीच नावाची नोंद सन २०१० साली ७/१२ उताऱ्यास गुपचुप पणे लावुन घेतलेली होती. वास्तविक पाहता मिळकत मौजे सोनई, (नविन) ता. नेवासा, जि. अहमदनगर येथील गट नंबर ११३६/२ पैकी क्षेत्र ० हे ६५ आर आकार १ रु ४० पैसे या मिळकतीस अर्जदार नं.१ ते ५ हे देखील कायदेशिर वारस होते व आहे. तदनंतर काही दिवसांनी अर्जदार नं.१ ते ५ यांचा भाऊ नामे संजय पावलस साळवी हा दिनांक १८/०१/२०१६ रोजी मयत झालेला असुन वर नमुद मिळकतीस संजय याचे वारस म्हणुन सा.वाले नं.१ ते ३ यांची फेरफार नं.३३८२३ अन्वये ७/१२ उताऱ्यास बेकायदेशिर वारस नोंद झालेली होती. परंतु ग्राम महसुल अधिकारी तथा कामगार तलाठी सोनई यांनी सदर अर्ज घेण्यास नकार दिला व अर्जदार यांना मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणण्याबाबत सुचविलेले आहे. म्हणुन अर्जदार नं.१ ते ५ यांना मयत पावलस ऊर्फ रमेश बाबुराव साळवी यांचे कायदेशिर वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

तरी मयत पावलस ऊर्फ रमेश बाबुराव साळवी यांना अर्जदार व सा. वाले हेच एकमेव वारस नाहीत असे कोणाचे म्हणणे असेल तर त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द दि. ०१/०८/२०२६ या नेमलेल्या तारखेच्या दिवशी स्वतः अगर वकिलामार्फत सर्व कागदपत्रानिशी या न्यायालयात उपस्थित रहावे. उपस्थितीत राहण्यास कसुर केल्यास न्यायालय पुरावा घेऊन योग्य ते आदेश पारीत करेल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले असे.

**कामगिरी लिपिक दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर, नेवासा** (शिक्का) **हुकूमावरुन अधिक्षक दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर, नेवासा**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट नमुद मिळकत ही श्री. महंमद हबीब शेख, रा. वॉर्ड नं.१, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर यांची वडीलोपार्जित वारसाहक्काने मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीची असून सदर मिळकत ही त्यांना इतर सोयीस्कर ठिकाणी मिळकत घेणेसाठी सदर मिळकतीचा त्यांनी आमचे अशिलांबरोबर कायम खरेदीचा व्यवहार ठरवला आहे. त्याप्रमाणे आमच्या अशिलासोबत त्यांनी मे. नोटरी साहेब, श्रीरामपूर यांचे समोर दि.०६/०७/२०२६ रोजी विसार पावतीचा दस्त क्र. १४३१/२०२६ साक्षीदारांसमक्ष नोंदवुन दिलेला आहे. तरी विद्यमान मालकाने सदर मिळकत ही निर्वेध, निष्कर्जी, बोजारहित असल्याची खात्री व भरवसा दिलेला आहे. तरी सदर मिळकती संबंधाने इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, गहाण, दान, लिज, लायसेन्सी, भाडेपट्टा, पोटगी तसेच न्यायालयात मिळकतीबाबत कुणाचा वाद सुरु असल्यास, तसेच कोणत्याही प्रकारचा बँक बोजा कोणत्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध असल्यास अशा व्यक्तींनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसाच्या आत आमच्या कार्यालयीन पत्त्यावर येवून कागदपत्रानिशी खात्री पटवून द्यावी. परस्पर जाहिर नोटीस उत्तर स्वीकारण्यात येणार नाही. वर नमुद मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत न आल्यास आमचे अशिल वर नमुद मिळकत मालकांबरोबर खरेदीचा दस्त मे. दुय्यम निबंधक साहेब, श्रीरामपूर यांचे कार्यालयात नोंदवुन पुर्ण करतील. वर नमुद मुदतीनंतर कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही.

परिशिष्ट 'अ'

१) मिळकतीचे वर्णन जिल्हा परिषद तुकडी अहिल्यानगर पोट तुकडी तालुका पंचायत समिती श्रीरामपूर व मौजे श्रीरामपूर नगरपरिषद व सिटी सर्व्हे हददीतील ले-आऊट मधील बांधकाम व प्लॉट बिनशेती जागा. यांसी जुना सर्व्हे नं. ५२ पैकी, नवीन सर्व्हे नं. ४९/१ ते २/७३, सि.स.नं.२००२ पैकी, क्षेत्र १०० चौ.मी. यांचे अंदाजे बांधकाम क्षेत्र १०१ चौ. फुट.

यांसी चतुःसिमा पुढील प्रमाणे
पुर्वेस : सि.स.नं.२००२ पैकी शांताबाई अशोक सातुरे यांची मिळकत.
दक्षिणेस : १० फुटी रस्ता.
पश्चिमेस : सि.स.नं.२००२ पैकी रोहिणी धोंडीराम कुन्हे यांची मिळकत
उत्तरेस : रस्ता.

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक बखळ प्लॉट मिळकत व त्यातील काही एक राखून न ठेवता. ही जाहिर नोटीस आमचे सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली असे.

ठिकाण : श्रीरामपूर.
दिनांक : १०/०७/२०२६

(शिक्का)

**ॲड.ए.पी.परदेशी**
**आफीस नं.७४, पहिला मजला, मिनी स्टेडीयम, नवीन कोर्टा समोर, वॉर्ड नं.१, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर.**
**मो.नं. ९३२६६१०६१०, ७३७८५५४१४१**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यू/एसआर/१९०/२०२६
नेवासा दिनांक ०२/०७/२०२६

अर्जदार श्री /श्रीम-संजय ज्ञानदेव पालवे रा. सोनई ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करून अर्जदार यांनी के. ज्ञानदेव निवृत्ती पालवे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला नझाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म- मृत्यु नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै. ज्ञानदेव निवृत्ती पालवे, गावाचे नाव-सोनई, मृत्यु दिनांक-२२/०६/२०२३

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर नोटीस

निशाणी नं. ०७
दिनांक
नेमलेली तारीखः १३/०८/२०२६

ॲड. टी. बी. ढोकणे
नेवासा कोर्ट

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, ज्यु.डी. यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं.८४/२०२६

**अर्जदार** -
गंगाधर बन्सी धोत्रे, वय ७५, धंदा - शेती रा. बेलपांढरी, ता. नेवासा जि. अहिल्यानगर, मो.नं. ८९७५०९५९१०
**सामनेवाले**
कोणीही नाही,
**मयत**
**बन्सी रामा धोत्रे**
(मयत दि. ०८/०८/२०१७)

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मे. न्यायालयात मयतास वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला असून मयत बन्सी रामा धोत्रे हे अर्जदाराचे वडील असून ते दि. ०८/०८/२०१७ रोजी मयत झालेले आहे. अर्जदाराचे वडीलांचे नावे मौजे बेलपांढरी, ता. नेवासा येथील गट नं. ४ पैकी याचाच सव्हे नं. ४०/५ यापैकी क्षेत्र ० हे. ७३ आर में, कार्यकारी अभियंता जायकवाडी प्रकल्प बांधकाम विभाग क्र. ३ यांनी शासकीय कामाकरीता संपादीत केले होते. सदर क्षेत्र मयत बन्सी रामा धोत्रे यांचे नावे संपादीत झालेले आहे. सदर क्षेत्र जायकवाडी प्रकल्पासाठी संपादीत केलेले असल्याने अर्जदाराचे वडील मयत बन्सी रामा धोत्रे हे प्रकल्पग्रस्त होते व आहे. अर्जदार प्रकल्पग्रस्त असल्याने अर्जदार हा मयत बन्सी रामा धोत्रे यांना एकमेव कायदेशीर वारस आहे. त्यामुळे त्यांनी मे. पुनर्वसन जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे प्रकल्पग्रस्त दाखल्याची मागणी केली असता, त्यांनी मयत बन्सी रामा धोत्रे यांना तुम्ही वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत मे. कोर्टाकडून घेवुन या असे १ महिण्यापुर्वी सांगीतले, म्हणून सदरचा अर्ज अर्जदार यांनी दाखल केलेला होता व आहे.

त्या अधी सदरील वादासंबंधीत कोणाचेही काही एक म्हणणे किंवा कोणाची काही एक हरकत असेल तर या जाहिर नोटीस प्रसिध्द झाले तारखेपासुन एक महिण्याच्या आत दि.१३/०८/२०२६ पर्यंत या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रांनिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसूर केल्यास सदरील अर्जाची

सुनावणी होवून योग्य तो हुकुम केला जाईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०८/२०२६ रोजी माझी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा
नेमलेली तारीख : १३/०८/२०२६

**तयार करणार व लिपीक दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर नेवासा** (शिक्का) **हुकुमावरुन सह.अधिक्षक दिवाणी न्यायालय क स्तर नेवासा**

## पान १ वरुन

### शाळेभोवती टवाळखोरांची गर्दी, पाच हुल्लडबाज पोलिसांच्या ताब्यात

शाळा किंवा महाविद्यालय परिसरात मुलींची छेड काढणे, विनाकारण फिरणे किंवा गोंधळ घालणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. अशा घटना आढळल्यास नागरिकांनी किंवा विद्यार्थ्यांनी तातडीने '११२' या आपत्कालीन क्रमांकावर किंवा पोलिसांशी संपर्क साधावा. तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवली जाईल, असे आवाहन पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबुर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुजीतकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली पो.उप.नि. सचिन लिमकर तसेच पोलिसांच्या पथकाने केली.

### बनावट दिव्यांग प्रमाणपत्राद्वारे शासकीय योजनेचा लाभ

तहसीलदार यांनी शेवगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३४०(२) व ३३६(३) अन्वये संतोष रतन खरड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल परशुराम भीमराव नकाडे करीत आहेत.

### सावळीविहीरच्या साई जतिन दुध प्लॅन्टमधे तब्बल २२ टँकर निकृष्ठ दुधाची आफरातफर

पासून सुरू आहे.अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने या प्लॅन्टची तपासणीदरम्यान दररोजचे दूध संकलन किती, त्या दुधाची गुणवत्ता नियंत्रण कसे, प्रयोगशाळेच्या चाचण्या आणि नोंदवही याची बारकाईने चौकशी केली असता डेअरी चालकाकडून उडवा उडवीची उतरे देण्यात आली. तसेच गेल्या सहा महिन्यांत त्यांनी संकलन करून मोठ्या दूध संघाकडे कमी प्रतिचे तब्बल टॅकर नाकारण्यात आले होते. ते नाकारलेले २२ टॅकर दूधाची काय विल्हेवाट लावली याचा खुलासा करण्यात ते अपयशी ठरले. साई जतीन दुध संकलन केंद्रातील व्यवस्थापनात गंभीर अनियमितता आढळून आल्याने ही कठोर कारवाई करण्यात आली. एफडीएच्या तपासणीत सर्वात धक्कादायक बाब म्हणजे गेल्या सहा महिन्यांत तब्बल २२ दूध टँकर विविध कारणांमुळे रिजेक्ट करण्यात आले होते. मात्र या रिजेक्ट टँकरांची अधिकृत नोंदच उपलब्ध नसल्याचे उघड झाले. एवढेच नव्हे तर रिजेक्ट झालेले दूध नेमके कुठे गेले, त्याची विल्हेवाट कशी लावण्यात आली, याबाबत कोणतीही माहिती केंद्राकडे नसल्याने संपूर्ण गुणवत्ता नियंत्रण प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

औषध प्रशासनने केलेल्या टिप्पणीमध्ये प्रत्यक्षात केलेले दूध संकलन रजिस्टर, दूध वितरण नोंदी, प्रयोगशाळेतील चाचण्यांची माहिती तसेच रिजेक्ट टँकरांच्या नोंदी अपूर्ण असल्याचे स्पष्ट झाले. अन्नसुरक्षा कायद्यानुसार व नियमांनुसार अशा सर्व नोंदी अद्ययावत ठेवणे बंधनकारक असताना साई जतीन दुध केंद्राकडून नियमांचे पालन करण्यात आले नसल्याचा आरोप करत नियमभंगाचा ठपका एफडीएने ठेवला आहे.एफडीएच्या अधिकाऱ्यांनी दुधाचे नमुने ताब्यात घेऊन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहेत. या अहवालात भेसळ, निकृष्ट दर्जा किंवा अन्य अनियमितता आढळल्यास संबंधित मालकाला बेड्या पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान या कारवाईमुळे दुग्ध व्यवसायीकांमधे प्रचंड घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# लोकनेते मारुतरावजी घुले पाटील आदर्श राजकारणी : महंत ज्ञानेश्वर माऊली कदम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** घुले पाटील नावाच्या ब्रह्मगिरीतून नेवासा-शेवगाव तालुक्यासह नगर जिल्ह्यामध्ये विकासाची गंगा उदयास आल्याने शेतकरी-कष्टकरी आर्थिक-शैक्षणिक दृष्ट्या भक्कम झाला.लोकनेते मारुतरावजी घुले पाटील हे आधार तीर्थ, शिक्षण प्रेमी, आदर्श पिता, कुशल संघटक, परमार्थ प्रेमी आणि आदर्श राजकारणी होते असे प्रतिपादन श्रीक्षेत्र आळंदी येथील ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज यांनी केले.

भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना व उद्योग समूहाचे संस्थापक लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या २४ व्या पुण्यस्मरणानिमित्त भेंडा येथील श्रीसंत नागेबाबा भक्तनिवास मध्ये आयोजित किर्तनाचे कार्यक्रमात कदम महाराज बोलत होते.

किर्तनाच्या प्रारंभी वाणीभूषण ज्ञानेश्वर माऊली महाराज कदम,ज्ञानेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले, संचालक माजी आ चंद्रशेखर घुले, माजी आमदार पांडुरंग अभंग, उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे, अँड. देसाई देशमुख आबा, सभापती डॉ.क्षितिज घुले पाटील, राज्य साखर कामगार फेडरेशनचे सरचिटणीस नितिन पवार व इतर मान्यवरांनी कारखाना कार्यस्थळावरील लोकनेते घुले पाटील यांचे स्मृतीस्थळावर पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

ज्ञानेश्वर माऊली कदम यांनी लोकनेते मारुतराव घुले पाटलांनी साखर कारखान्याला ज्ञानेश्वर माऊलींचे नाव दिले. त्याच बरोबर कारखान्याच्या गेटसमोर माऊलींचे मंदिर ही बांधले. कारखान्याला माऊलींचे नाव असल्यामुळे अल्कोहोल निर्मिती केली मात्र दारू निर्मिती केली नाही, यावरून त्यांचे परमार्थ प्रेम दिसून येते असे सांगितले.

तसेच घुले पाटील परिवार हा पारमार्थिक परिवार आहे. घुले पाटलांचा विचारांचा आणि विकासाचा वारसा नरेंद्र घुले पाटील व चंद्रशेखर घुले पाटील ही राम-लक्ष्मणाची जोडी पुढे नेत आहेत. श्रीक्षेत्र देवगड संस्थानचे उत्तराधिकारी प्रकाशानंदगिरी महाराज, श्रीसद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख उद्धव महाराज मंडलिक, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त देविदास महाराज म्हस्के, राम महाराज झिंजूर्के, रामनाथ महाराज काळेगावकर, रमेशानंदगिरी महाराज, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे,ज्ञानेश्वर कारखान्याचे संचालक पंडितराव भोसले,अशोक मिसाळ,डॉ.नारायण म्हस्के, जनार्धन कदम, मच्छिंद्र म्हस्के, बबनराव भुसारी, अँड. हिम्मतसिंह देशमुख,अमोल अभंग, विकास नन्नवरे,संतोष पावसे, जनार्दन शेळके, दादासाहेब कोकणे,

कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, सरव्यवस्थापक रविंद्र मोटे,कामगार संचालक सुखदेव फुलारी, मुळा साखर कारखान्याचे अध्यक्ष भाऊसाहेब मोटे, माजी उपाध्यक्ष कडूबाळ कर्डिले, काशिनाथ नवले, भेडां सरपंच सौ.सुहासीनी किशोर मिसाळ,जनार्धन पटारे, संजय कोळगे, ताहीर पटेल, अनिल मडके,

बबनराव धस,काकासाहेब शिंदे, शिवाजी कोलते, भाऊसाहेब कांगुणे, दादासाहेब गंडाळ, विष्णू जगदाळे, सखाराम लव्हाळे, अजित मुरकुटे, डॉ.शिवाजी शिंदे, आदींसह उस उत्पादक शेतकरी,विविध संस्थाचे पदाधिकारी,सभासद, कारखान्याचे अधिकारी व कामगार मोठया संख्येने उपस्थित होते.



# ग्रंथराज ज्ञानेश्वरी पायी पालखी दिंडीचा पहिला रिंगण सोहळा, माऊलींच्या कर्मभूमीत रंगला

**गंगापूर :** संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र नेवासा येथील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी सोहळा दिंडीचे बुधवारी दि.८ जुलै रोजी संत महंतांच्या उपस्थितीत दुपारी ३.३० च्या सुमारास पंढरपूरकडे प्रस्थान करण्यात आले.या दिंडीचे नेतृत्व संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख महंत गुरुवर्य वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री, गंगापूर येथील गाथा मूर्ती हभप रामभाऊ महाराज राऊत, हभप राम महाराज झिंजूर्के हे करत आहे.नेवासा येथून निघालेल्या माऊलींच्या या पालखी दिंडीत सुमारे तीस दिंडयांसह हजारो वारकऱ्यांनी सहभाग नोंदवला आहे.माऊलींच्या कर्मभूमी असलेल्या नेवासेनगरीत आषाढी दिंडी सोहळयातील पहिला रिंगण सोहळा वारकऱ्यांनी यावेळी एस टी स्टॅण्ड प्रांगणात साजरा केला.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ''पैस'' खांब मंदिराचे निर्माते वैकुंठवाशी ह.भ.प.बन्सी महाराज तांबे यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या दिंडीच्या प्रस्थानापूर्वी माऊलींच्या पादुकांचे व ''पैस'' खांबाचे पूजन श्री क्षेत्र देवगड संस्थानचे महंत राष्ट्रसंत गुरुवर्य श्रीभास्करगिरीजी महाराज,सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक,आळंदी येथील हभप ज्ञानेश्वर माऊली कदम महाराज,वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री, त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरीजी महाराज,मध्यमेश्वर देवस्थानचे महंत ऋषिनाथजी महाराज,रामकृष्ण विवेकानंद आश्रमाचे स्वामी श्री ज्ञानेश्वरजी महाराज दिंडी चालक राम महाराज झिंजुरके यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात करण्यात आले.

संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणातून पालखी दिंडी सोहळयास प्रारंभ झाला यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील व सौ.रत्नमालाताई लंघे पाटील,देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग,माजी आमदार नरेंद्र घुले पाटील, बाळासाहेब मुरकुटे,शंकरराव लोखंडे,शिवसेनेचे युवा नेते प्रभाकरराव शिंदे, युवा नेते उदयनदादा गडाख पाटील, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले डॉ.क्षितिज घुले,नेवासा मार्केट कमिटीचे सभापती नंदकुमार पाटील,अँड.संजय सुखदान व सर्व नगरसेवकांच्या हस्ते पालखी रथातील पादुकांचे पूजन करण्यात आले.

निघालेल्या दिंडीमध्ये अग्रभागी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेतले वारकरी, डोक्यावर तुळशी कलश घेतलेल्या महिला भगिनी, ''ज्ञानोबा माऊली तुकाराम असा नामघोष करणारे महिला भजनी मंडळ,वारकरी भाविक त्यामागे पुष्पांनी सजविण्यात आलेल्या




चांदीचा रथामध्ये माऊलींच्या पादुका,त्यामागे महिला भाविक असे या दिंडीचे स्वरूप होते. दिंडीद्वारे नेवासेनगरीला प्रदक्षिणा घालण्यात आली.

नेवासा शहरात सदर दिंडीचे चौकाचौकात फटाक्यांची आतषबाजी व तोफांची सलामी देत व्यापारी,नागरिक महिला सुवासिनींनी रांगोळ्या घालून स्वागत केले. सदरची दिंडी नगरपंचायत चौकात आल्यानंतर स्वर्गीय राजेंद्र मापारी मित्र मंडळाच्या वतीने जेसीबीद्वारे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. नगरसेवक स्वप्नील मापारी यांच्या वतीने उपस्थित संत महंतांचे संतपूजन करण्यात आले.एस टी स्टॅण्ड प्रांगणात राज्यातील दुसरा तर सोहळयातील पहिला रिंगण सोहळा वारकऱ्यांनी साजरा केला.

यावेळी नेवासा आगाराच्या वतीने आगार व्यवस्थापक प्रशांत होले अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नेवासा प्रेस क्लब व उपस्थित पत्रकारांच्या वतीने पालखीचे पूजन करून पालखी सोहळयात नेतृत्व करणाऱ्या देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांचे संतपूजन करण्यात आले.यावेळी अश्व रिंगण,झेंडा रिंगण,टाळ मृदुंग रिंगण,भजनी मंडळातील महिलांचे रिंगण ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या गजरात पार पडले.

सदर दिंडीतील रिंगण सोहळयाच्या प्रसंगी हभप भगवान महाराज जंगले शास्त्री,नंदकिशोर महाराज खरात,कृष्णा महाराज हारदे,ज्ञानेश्वर माऊली शिंदे,रामेश्वर महाराज कंठाळे, ज्ञानेश्वर महाराज हजारे,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, रामनाथ महाराज वाकचौरे, हरी महाराज वाकचौरे, अंजाबापू कर्डीले,हरी महाराज भोगे यांच्यासह वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी नेवासकर नागरिक महिला पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## निधन वार्ता

### दिलीप लबडे



**श्रीरामपूर :** तालुक्यातील भैरवनाथनगर (गोंधवणी) महादेव मंदिर देवस्थानचे माजी अध्यक्ष व विश्वस्त दिलीप नारायणराव लबडे (वय ६८) यांचे बुधवार, दि. ८ रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ भाऊ, १ मुलगा, २ मुली, सुन, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते अशोक लबडे यांचे बंधु, केंबिज इंग्लिश मिडीयम स्कुलचे शिक्षक प्रसाद लबडे यांचे वडील तसेच रोहित व राहुल लबडे यांचे ते चुलते होत.

### लक्ष्मण लांडगे



**टाकळीभानः** येथील लक्ष्मण (नाना) दादासाहेब लांडगे (वय ६६ ) यांचे नुकतेच अकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना नातवंडे असा मोठा परिवार होता. पप्पु व स्वप्नील यांचे ते वडील तर जेष्ठ पत्रकार चंद्रकांत लांडगे यांचे ते मोठे भाऊ होत.

### वासुदेव वाघमारे



**श्रीरामपूर :** शहरातील प्रमुख औषध व्यावसायिक रमा मेडीकलचे संचालक वासुदेव रंगनाथ वाघमारे (वय ८१) यांचे मंगळवार, दि. ७ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते महिला मंडळाच्या जेष्ठ विश्वस्त शैलजाताई वाघमारे यांचे पती होत.

### सुधीर भाटिया



**शिरसगाव :** हरिगाव, येथील किराणा व्यापारी सुधीर लक्ष्मीचंद भाटिया (वय ६९) यांचे निधन झाले त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, चुलते नातवंडे असा परिवार आहे. रणधीर भाटिया यांचे बंधू व सुरज भाटिया यांचे वडील होत.

## वारकरी संप्रदाय हा सगुण अन् निर्गुण या दोघांचा समन्वय : महंत रामगिरी महाराज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** वारकरी संप्रदाय हा सगुण अन् निर्गुण या दोघांचा समन्वय ,शिव आणि विष्णू यांची एकता साधणारा संप्रदाय आहे. भक्तांना चरण स्पर्श दर्शन फक्त पंढरपुरच्या पांडुरंग मंदिरातच होते.जगातील अन्य कुठल्याही मंदिरात होत नाही. पांडुरंगाचे हे जगातील एकमेव मंदिर असल्याचे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी पायी पालखी सोहळ्याचे उत्सव मंगल कार्यालय श्रीरामपूर येथील मुक्कामाचे ठिकाणी भाविकांना उपदेश करताना केले. श्रीरामपूरातील थत्ते ग्राऊंडवर मुख्य सोहळा आटोपल्यावर उत्सव मंगल कार्यालय येथील प्रवचनातून दिंडीतील वारकरी व शहरातील भाविकांना उपदेश करताना महंत रामगिरी महाराज पुढे म्हणाले की पांडुरंग परमात्मा सगुण अन् निर्गुण आहे.पंढरीचे पहीले वारकरी भगवान शिव आहे. पंढरीच्या पांडुरंगाने भगवान शिवाला डोक्यावर घेऊन घेतले होते. वारकरी संप्रदायात शिव आणि विष्णुची एकता आहे. संत ज्ञानेश्वर महाराज संत एकनाथ महाराज हे वैष्णव संप्रदायातील आहेत. चरण स्पर्श दर्शन फक्त पांडुरंग मंदिरातच होते जगात अन्य कुठल्याही मंदिरात होत नाही. सगुण निर्गुण या दोघांचा समन्वय साधणारा वारकरी संप्रदाय आहे. या पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी मोटार कार अन्य वाहणारे जाणारे भाविकही दर्शन घेतात.पायी जाणारेही उशीराने का होईना दर्शन घेतात . परंतु आषाढी पालखी सोहळ्याने पायी जाऊन दर्शन घेणारे वारकरी भक्तांना पांडुरंग दर्शनाचा आनंद हा आगळावेगळा आहे. श्रीक्षेत्र सरालाबेट हे श्रीरामपूर तालुक्यात येत असल्याने श्रीरामपूर शहरातील विविध मंडळे, व्यापारी, राजकीय सामाजिक क्षेत्रातील भाविकांनी मनोभावे स्वागत केले.श्रीरामपूर नगरपालिकेने सदगुरू गंगागिरी महाराज दिंडी सोहळ्याचे व्यवस्था साठी बजेटमध्ये कायमस्वरूपी एक लाख रूपयांची तरतूद केली आहे. त्याबद्दल महाराजांनी नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष व सहकारी सर्व नगरसेवकांचे आभार मानले. सराला बेटाचे भक्त नारायणराव डावखरे परिवाराने शहरात आश्रयासाठी १३ गुंठे जागा दान केली.याशिवाय दरवर्षी आषाढी वारी दिंडी सोहळ्यास उत्सव मंगल कार्यालय येथे विनामूल्य मुक्काम व्यवस्था करतात.

## अंगणवाडी सेविकांना विशेष सखोल पुनर्निरीक्षणाचे काम देऊ नये; निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** केंद्र शासनाच्या निर्देशानुसार कुपोषण निर्मूलनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मानधनी अंगणवाडी सेविकांवर मतदार यादीच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (Special Intensive Revision - SIR) मोहिमेची जबाबदारी टाकू नये, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पूर्व प्राथमिक (अंगणवाडी) शिक्षक भरती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी उपविभागीय अधिकारी अरुण जराड, तहसीलदार सुनील सावंत उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की,



अंगणवाडी सेविका व मदतनीस या सहा वर्षांखालील बालकांचे पोषण, गर्भवती व स्तनदा मातांची आरोग्य सेवा, तसेच पूर्व प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी पार पाडत आहेत. राज्यात कुपोषणाचे प्रमाण अद्यापही चिंताजनक असल्याने अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी पूर्णवेळ बालविकासाशी संबंधित कामांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

संघटनेने नमूद केले आहे की, महिला व बालविकास विभागाच्या निर्देशानुसार अंगणवाडी सेविकांना त्यांच्या मूळ कामांव्यतिरिक्त इतर कोणतीही कामे देऊ नयेत. तसेच सर्वोच्च न्यायालयानेही अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पल्स पोलिओसारख्या मर्यादित कामांव्यतिरिक्त इतर शासकीय कामे देण्याबाबत निर्बंध घातल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षणासाठी अंगणवाडी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्यास बालकांच्या पोषण, आरोग्य व शिक्षणाशी संबंधित दैनंदिन सेवांवर परिणाम होईल. त्यामुळे ही जबाबदारी अंगणवाडी सेविकांना देऊ नये व त्यांना त्यांच्या मूळ कर्तव्यांवरच कार्यरत ठेवावे, अशी मागणी संघटनेने केली आहे.

या निवेदनावर जिल्हाध्यक्ष माया म्हस्के, संघटक अश्विनी सोनवणे (बरकसे )यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**Change in name**

I HAVE CHANGE MY OLD NAME
HEENA AJIM SHAIKH
(IN MY HUSBAND PASSPORT
No.P1845203 SPOUSE NAME
CHANGE) (BEFORE NAME)
TO THE NEW NAME AS
ASMA AJIM SHAIKH
( AADHAR No. 6322 9400 0102)
FROM VIDE AFFADAVIT
BEFORE
NOTARY PUBLIC RAHURI
PLACE – RAHURI
DATE – 10/07/2026

**Change in name**

I HAVE CHANGE MY OLD NAME
IN SON BIRTH CERTIFICATE
UMERA MOHAMMAD AHMED
SHAIKH
(BEFORE NAME)
TO THE NEW NAME AS
HUMERA MOHAMMAD AHMED
SHAIKH
( AADHAR No. 3125 3711 7649)
FROM VIDE AFFADAVIT
BEFORE
NOTARY PUBLIC PUNE
PLACE – PUNE
DATE – 10/07/2026

## वाकडी ते पंढरपूर पायी दिंडीचे रविवारी प्रस्थान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वाकडी :** राहाता तालुक्यातील श्री क्षेत्र खंडोबाची वाकडी ते श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे रविवार, (दि.१२) जुलै रोजी भव्य प्रस्थान होणार आहे. यंदा या दिंडी सोहळ्याचे १९ वे वर्ष असून, परिसरात जय्यत तयारी सुरू आहे.

यंदा समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकरी वर्ग व वारकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. रविवारी खंडोबा व पांडुरंगाची आरती झाल्यानंतर टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडी पंढरपूरकडे मार्गस्थ होईल. १२ ते २६ जुलै दरम्यान चालणाऱ्या या दिंडीत पंचक्रोशीतील शेकडो महिला व पुरुष वारकरी सहभागी होणार आहेत. प्रवासात बेलापूर, विळदघाट, करमाळा, करकंब या ठिकाणी दिंडीचे मुक्काम असतील. या भक्तीमय सोहळ्यात जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जय मल्हार पायी दिंडी सोहळा व वाकडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नगर-मनमाड महामार्गावरील निकृष्ट कामाची चौकशी करा

### ठेकेदार व अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** अहिल्यानगर-मनमाड (एनएच-१६०) महामार्गाच्या दुरुस्तीवर गेल्या काही वर्षांत शेकडो कोटी रुपये खर्च होऊनही रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे झालेल्या अपघातांसाठी संबंधित ठेकेदार, सुपरव्हिजन कन्सल्टंट आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी शिवसेनेचे नेते पै. रावसाहेब खेवरे यांनी केली आहे. या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

या संदर्भात निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते तसेच राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या प्रशासनाला निवेदन देण्यात आले. निवेदनात नगर-मनमाड महामार्गावरील दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. गेल्या चार ते पाच वर्षांत नगर-सावळी विहीर मार्गाच्या दुरुस्तीसाठी सुमारे १०० ते २०० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आल्याचा दावा करत, एवढा निधी खर्च होऊनही रस्ता खड्डेमय झाल्याने संपूर्ण कामाची व खर्चाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, शिंदे डेव्हलपर्स, मनीषा कन्स्ट्रक्शन, जय हिंद रोड बिल्डर यांच्यासह विविध कंपन्यांना कोट्यवधी रुपयांची देयके अदा करण्यात आली. एप्रिल २०२५ पासून भारत कन्स्ट्रक्शन कंपनीकडे दुरुस्तीचे काम सोपविण्यात आले असले तरी करारानुसार रस्त्याची देखभाल व सुरक्षिततेची जबाबदारी योग्यरीत्या पार पाडण्यात कंपनी अपयशी ठरल्याचा आरोप करण्यात आला आहे. कामामध्ये निकृष्ट दर्जाची काळी माती, मुरूम, खडी, डांबर व काँक्रीट वापरण्यात आल्याचा तसेच आवश्यक परवानग्यांशिवाय गौण खनिजांचा वापर झाल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. रॉयल्टी, उत्खनन आणि वापरलेल्या साहित्याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. महामार्गावरील अनेक ठिकाणी रस्ता उकरून ठेवण्यात आल्याने सुमारे २० किलोमीटरपर्यंत नियोजनशून्य एकेरी वाहतूक सुरू आहे. आवश्यक इशारा फलक, बॅरिकेड्स व अन्य सुरक्षा उपायांचा अभाव असल्याने अपघातांचे प्रमाण वाढल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच लहान पुलांच्या बांधकामातही दर्जाहीन काम झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या नियमांनुसार थर्ड पार्टी ऑडिट, साहित्याची तपासणी व कामाच्या प्रत्येक टप्प्याची पडताळणी झाल्याशिवाय देयके अदा करता येत नाहीत. या नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत भारत कन्स्ट्रक्शन कंपनीची पुढील सर्व देयके तातडीने थांबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, २५ जुलै रोजी होणाऱ्या आषाढी वारीसाठी हजारो वारकरी याच मार्गाने पंढरपूरकडे जाणार असल्याने अपूर्ण काम, खड्डे आणि उखडलेल्या रस्त्यांमुळे वारकरी व वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी रावसाहेब खेवरे यांच्यासह पोपट शिरसाट, विजय शिरसाठ, हमीद पटेल, सुनील शेलार आदी उपस्थित होते.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शनिवार दि .११ जुलैं २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२९<br>१५६<br>११० | २-६ | १२३<br>३६७<br>५५६ | जोड<br>२४-८६-०३-९५-६७ |

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १९०<br>४६०<br>२८० | ०-५ | १४०<br>२३०<br>७८० | जोड<br>०१-२५-४३-७९-५८ |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १३०<br>१४९<br>११२ | ४-२ | १३८<br>२४६<br>२२८ | जोड<br>४०-६२-७१-३९-२५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

द • ख • ल

## पाटबंधारे विभागाच्या विरोधात ठेकेदार आक्रमक



**ढोरजळगांव :** मुळा पाटबंधारे विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध विकासकामांच्या ई- निविदांपैकी मर्जीतील ठेकेदाराच्याच निविदा मंजूर करत इतर निविदा अपात्र ठरविण्याचा धडाकाच काही अधिकाऱ्यांनी लावला आहे. निविदांची पारदर्शकपणे पुनर्तपासणी न झाल्यास १५ जुलैपासून उपोषण करण्याचा इशारा कंत्राटदारांच्या शिष्टमंडळाने दिला आहे. बांधकाम संघटनेचे माजी सचिव उदय मुंढे यांच्या नेतृत्वाखाली ठेकेदार दत्तात्रय दराडे, अक्षय कराड, नीलेश रोकडे, आदिनाथ घुले, नारायण वनवे आदींनी मुळा पाटबंधारे विभागाचे सहाय्यक अधीक्षक अभियंता ओमकार भंडारी व उपकार्यकारी अभियंता धनश्री शिंदे यांना निवेदन देऊन उपोषणाचा इशारा दिला आहे. या निवेदनात म्हटले आहे की, मुळा पाटबंधारे विभागातर्फे वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या ई-निविदांप्रमाणे पात्र शासकीय कंत्राटदार सर्व आटीशर्टींची पूर्तता करत मुदतीत ई निविदा सादर करत आहेत. त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेबाबत गंभीर शंका निर्माण झाली आहे. निविदा प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, नियमबाह्य कार्य तसेच मोठ्या आर्थिक अनियमिततेचा संशय निर्माण निर्माण झाला आहे.

## खातगाव टाकळीत घरफोडी ८० हजारांचे दागिने लंपास

**अहिल्यानगर :** तालुक्यातील खातगाव टाकळी येथे एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबई येथे राहणारे प्रविण सुर्यभान कुलट यांचे खातगाव टाकळी येथे मूळ घर आहे. २९ जून ते ८ जुलै दरम्यान त्यांचे घर बंद होते. याच संधीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडले. चोरट्याने घरात प्रवेश करून ३० हजार रुपये किमतीची ५ ग्रॅम सोन्याची अंगठी आणि ५० हजार रुपये किमतीचे १ तोळ्याचे मणी मंगळसूत्र, असा एकूण ८० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. प्रविण कुलट हे गावी परतल्यानंतर हा चोरीचा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार सुद्रीक करत आहेत.

## नव नागापूरमध्ये घरफोडी एक लाखाचा ऐवज लंपास

**अहिल्यानगर :** नवनागापूर परिसरातील सम्राटनगर येथे एक धक्कादायक घरफोडीची घटना समोर आली आहे. फिर्यादी संदीप अंकुश दुसुंगे यांच्या राहत्या घराच्या खालच्या मजल्यावरील खोलीचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रकमेसह एकूण एक लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संदीप दुसुंगे हे जेसीबी चालक असून ते सम्राटनगर येथे राहतात. ८ जुलैच्या रात्री साडेअकरा ते ९ जुलैच्या पहाटे पाच वाजेच्या दरम्यान सर्वजण झोपलेले असताना ही चोरी झाली. अज्ञात चोरट्याने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत त्यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडले व आत प्रवेश केला. चोरट्याने कपाटाचे लॉक तोडून आत ठेवलेली ५० हजार रुपयांची रोकड आणि ५० हजार रुपये किमतीची एक तोळ्याची सोन्याची चैन असा एकूण एक लाख रुपयांचा माल चोरून नेला. सकाळी चोरीचा प्रकार लक्षात आल्यानंतर संदीप दुसुंगे यांनी तत्काळ एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीच्या गुन्ह्याची नोंद केली आहे. या प्रकरणाची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक थोरात यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पुढील तपास पोलीस हवालदार रोहकले करत असून पोलीस परिसरातील संशयितांची चौकशी करत आहेत.

## सावेडी परिसरात भरदिवसा महिलेचे ५५ हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र पळविले

**अहिल्यानगर :** शहरातील सावेडी भागातील सिद्धिविनायक कॉलनी परिसरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे एका स्पीड ब्रेकर जवळ भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात दुचाकीस्वाराने रस्त्याने जात असलेल्या एका ४२ वर्षीय महिला नोकरदाराच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने ओढून चोरून नेले आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही घटना गुरुवारी संध्याकाळी पाच वाजेच्या सुमारास भिडे हॉस्पिटल चौकाजवळ घडली. पीडित महिला सावेडी परिसरातील रहिवासी असून, त्या आपल्या खाजगी नोकरीवरून घरी परतत असताना हा प्रकार घडला. दुचाकीवर आलेल्या एका अज्ञात आरोपीने गाडीचा वेग वाढवून महिलेच्या अगदी जवळून जात गळ्यातील ५५ हजार रुपये किमतीचे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र जोराने ओढून तोडले आणि काही सेकंदातच तेथून पळ काढला. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तोफखाण्याचे पो. नि. बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस कर्मचारी करत आहेत. पोलीस परिसरातील टेहळणी कॅमेऱ्यांच्या (सीसीटीव्ही) माध्यमातून अज्ञात आरोपीचा माग काढत आहेत.

# ठेकेदारांकडे ७ कोटींची थकबाकी

## ८ कोटींच्या वसुलीची नोटीस मात्र माथाडी कामगारांना

### सहाय्यक कामगार आयुक्तांचा अजब कारभार, कामगारांचा आक्रमक पवित्रा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** रेल्वे मालधक्का येथील नोंदणीकृत माथाडी कामगारांनी सहाय्यक कामगार आयुक्त, अहिल्यानगर तथा अध्यक्ष माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. ठेकेदार हुंडेकऱ्यांकडून सुमारे सात कोटी रुपयांची थकबाकी असताना ती वसूल करण्या ऐवजी उलट गोर गरीब कामगारां कडूनच तब्बल आठ कोटी रुपयांची वसुलीची कारवाई सुरू केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे मंडळ हे कामगारांच्या हितासाठी आहे की थकबाकीदार असणाऱ्या बड्या ठेकेदारांना संरक्षण



देण्यासाठी, असा संतप्त सवाल शिवसेना कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे यांनी उपस्थित केला आहे.

ठेकेदारांकडे कोट्यावधींची थकबाकी असताना ८ कोटींच्या वसुलीच्या नोटीसा मात्र माथाडी कामगारांना धाडण्यात आल्यामुळे सहाय्यक कामगार आयुक्तांचा अजब कारभार चव्हाट्यावर आला आहे. त्या विरोधात कामगारांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. याबाबत सहाय्यक कामगार आयुक्त यांना निवेदन देत कामगारांचे आर्थिक शोषण थांबवण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी विलास उबाळे, सुनील भिंगारदिवे, जयराम आखाडे, गौतम सैंदाने, देवराम शिंदे, बाबासाहेब वैरागर, विनोद शिरसाठ, मल्हारी साप्ते, दिपक काकडे, राजेंद्र तरटे आदींसह कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याबाबत बोलताना विलास उबाळे म्हणाले, ठेकेदार हुंडेकऱ्यांकडे मागील सुमारे तीन वर्षांपासून कोट्यावधी रुपयांची थकबाकी आहे. त्याचा पहिला हप्ता मिळविण्यासाठी आम्हाला आमच्या संघटनेच्या माध्यमातून धरणे आंदोलन, मुंडण आंदोलन, मुंबईत आझाद मैदानावर सहा दिवस उपोषण, त्यानंतर बायको, लेकरा बाळांसह अहिल्यानगर शहराच्या बाजारपेठेतून आक्रोश मोर्चा काढावा लागला होता. तेव्हा कामगारांच्या पदरात पहिला हप्ता पडला. मात्र त्यानंतर दोन वर्ष उलटले तरी देखील जाणीवपूर्वक ठेकेदारांना पाठीशी घालण्याचे काम मंडळाकडून सुरू आहे. आम्ही मागणी करतो म्हणून आमचा आवाज दाबण्यासाठी आमच्यावरच चुकीच्या पद्धतीने तब्बल आठ कोटी रुपयांची वसुलीची कारवाई सुरू करून कामगारांना भीती दाखवली जात आहे. निवेदनात म्हटले आहे, ऑगस्ट २०२५ पासून हजेरी पत्रकानुसार पूर्ण वेतन देखील मिळत नसून दर महिन्याला वेतनात कपात करून कामगारांचे आर्थिक शोषण केले जात आहे.

**अन्यथा आंदोलनाचा इशारा**

गोरगरीब कामगारांनी हे कोट्यावधी रुपये आणायचे कुठून ? असा सवाल करत, यासंदर्भात सात दिवसांच्या आत लेखी खुलासा व थकबाकीदार ठेकेदारांच्या विरोधात ठोस कारवाई न झाल्यास सर्व कामगार सहाय्यक कामगार आयुक्तांच्या कार्यालयामध्ये सामूहिक फाशी देण्याची मागणी मंडळाकडे सर्व कामगार करणार असल्याचा विलास उबाळे यांनी इशारा दिला आहे. वेळ प्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कामगार आमरण उपोषण सुरू करतील, असा इशारा उबाळे यांनी यावेळी बोलताना दिला.

## शहरटाकळी विद्यालयात विद्यार्थ्यांनी गिरवले निवडणूकीचे धडे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शहरटाकळी :** विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीची मूल्यांची रुजवणूक व्हावी ,विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेची माहिती व्हावी, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निवडणूकांमध्ये सहभागी होता यावे या हेतूने कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शाळा प्रतिनिधी व वर्ग प्रतिनिधी यांची लोकशाही पद्धतीने निवड करण्यासाठी प्राचार्या अंजली चिंतामण, पर्यवेक्षक पोपट खताळ सहशिक्षक ज्ञानेश्वर जाधव, प्रवीण लद्दे व अशोक भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली मतपत्रिकेद्वारे प्रत्यक्ष मतदान घेण्यात आले. यामध्ये इ. ९ वी



ते १२ वीच्या विद्यार्थ्यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. इ.१२ वी मधून शाळा प्रतिनिधी पदासाठी मुलांमधून २ उमेदवार तर मुलींमधून ६ उमेदवार तर इ. १० वी मधून शाळा प्रतिनिधी पदासाठी मुलांमधून ६ उमेदवार तर मुलीमधून ४ उमेदवार , तर वर्ग प्रतिनिधीच्या निवडीसाठी ५० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. इ.९वी ते इ.१२वी मधील ४९९तर इ.५वी ते ८ वी मध्ये ६५० मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावत ८६ उमेदवाराचे भवितव्य मतपेटीत बंद केले.

यावेळी आशिष लोखंडे, बबनराव नवले, प्रा. अंजली चिंतामण, पोपट खताळ यांच्या शुभहस्ते प्रत्यक्ष उद्घाटन करून निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली. यावेळी केंद्राध्यक्ष म्हणून गणेश लबडे, निवडणूक अधिकारी क्रमांक १ ज्ञानेश्वर जाधव, निवडणूक अधिकारी क्रमांक २ सचिन गाडे व प्रवीण लद्दे यांनी काम पाहिले. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी दिपक बोडखे, बाळासाहेब दिंडे, राहुल गायके, सचिन कमानदार, बाळकृष्ण ठोंबळ, रामदास पांढरे, आदिनाथ काटे, रीना हांडे, निलोफर शेख, रावसाहेब गायकवाड यांनी परिश्रम घेतले. या सर्व उपक्रमाचे विद्यालयाच्या प्राचार्य अंजली चिंतामणी यांनी कौतुक केले.

## बहिणीला त्रास देणाऱ्याला जाब विचारल्याने तरुणाला बेदम मारहाण ; गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नातेवाईक महिलेला विनाकारण त्रास देणाऱ्या शेजाऱ्याला समजावून सांगायला गेलेल्या एका तरुणाला आरोपींनी लाथाबुक्क्यांनी व हातचापटीने बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी फिर्यादी लक्ष्मण मोहन रासकर (वय ३० वर्षे, रा. मांडवगण, श्रीगोंदा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी लक्ष्मण रासकर यांच्या नातेवाईक महिलेला सायकल लावण्याच्या कारणावरून शेजारी राहणाऱ्या कमलेश एनगंदुल याने शिवीगाळ व दमदाटी केली होती. सततच्या त्रासामुळे वाद मिटवण्यासाठी फिर्यादी तेथे गेले होते. त्यांनी कमलेश एनगंदुल याला बोलावून नातेवाईक महिलेला त्रास न देण्याबाबत समजावून सांगितले आणि पोलिसांत तक्रार करण्याची तंबी दिली. या गोष्टीचा राग मनात धरून आरोपी कमलेश एनगंदुल याने त्याच्या दोन मेव्हण्यांना, चुलत भावाला, मित्र खरमाळे आणि इतर दोन-तीन साथीदारांना बोलावून घेतले. या सर्वांनी मिळून फिर्यादीची गचांडी धरून त्यांना जमिनीवर पाडले आणि तोंडावर, पायावर व पाठीवर लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. मारहाणीत जखमी झालेल्या फिर्यादी लक्ष्मण रासकर यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले असून पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## पारधी समाजाच्या कुटुंबाला बेघर करण्याचा कट?

### एमआयडीसी अधिकारी, कंपनी मालक व पोलिसांवर गंभीर आरोप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** मौजे वाघुंडे बुद्रुक येथील आदिवासी हिंदू फासेपारधी समाजातील कीर्ती बाळू भोसले यांनी त्यांच्या वडिलोपार्जित मालकीच्या जागेवर बेकायदेशीर ताबा घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. संबंधित प्रकरणात सुपा एमआयडीसीचे अधिकारी, एका कंपनीचे मालक आणि काही पोलीस अधिकाऱ्यांनी संगनमत करून कुटुंबाला बेघर करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.



भोसले यांनी दिलेल्या निवेदनानुसार, मौजे वाघुंडे बुद्रुक येथील गट क्रमांक १८८ मधील जमीन ही त्यांच्या वडिलोपार्जित मालकीची असून त्या मिळकतीवर आदिवासी जमीनधारकांशी संबंधित महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यातील हस्तांतरण निर्बंध (कलम ३६ व ३६-अ) लागू असल्याचा दावा करण्यात आला आहे.

अशा परिस्थितीतही संबंधित अधिकाऱ्यांकडून बेकायदेशीररीत्या जागेचा ताबा घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, न्याय न मिळाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संपूर्ण कुटुंबासह आत्मदहन करण्याचा इशारा भोसले कुटुंबाने दिला आहे. कुटुंबामध्ये तीन मुली, मुलगा, आई-वडील व इतर नातेवाईकांचा समावेश असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## जि.प.च्या ५ वी-८ वी वर्ग धोरणाला तीव्र विरोध

### मुख्याध्यापक संघाचे निवेदन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्हा परिषद शाळांमध्ये चौथीनंतर पाचवी व सातवीनंतर आठवीचे वर्ग सुरू करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. अनेक गावात माध्यमिक शाळा कार्यरत असताना पुन्हा पाचवी-आठवीचे वर्ग समांतर सुरू केल्यास विद्यार्थ्यांचे विभाजन होऊन ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांच्या अस्तित्वाला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या धोरणाला विरोध दर्शविणारे निवेदन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना देण्यात आले.

निवेदन देताना जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्री. सुनील पंडित सर यांच्यासमवेत जिल्ह्यातील



मुख्याध्यापक संघाचे नेते व सेक्रेटरी संभाजीराव पवार, शिक्षक नेते वैभव सांगळे अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक सहकारी बँकेचे माजी चेअरमन मुख्याध्यापक दिलीपराव काटे, मुख्याध्यापक आप्पासाहेब नलगे आदी मान्यवर उपस्थित होते.

## देवाचं खाल्लं, दहाचे दोनच मिळाले!

### पायी दिंडी वारी निधीतील कथित गैरव्यवहारावर संभाजी ब्रिगेडचा दावा, उच्चस्तरीय चौकशीची मागणी कायम

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** पंढरपूर पायी दिंडी वारीसाठी २०२५ मध्ये मंजूर झालेल्या १० लाख रुपयांच्या निधीतील कथित भ्रष्टाचाराविरोधात संभाजी ब्रिगेडने उभारलेल्या लढ्याला मोठे यश मिळाल्याचा दावा संघटनेने केला आहे. यावर्षी संबंधित योजनेसाठी केवळ २ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, उर्वरित खर्च व निविदा प्रक्रिया जिल्हा परिषद स्तरावरून राबविण्याचा निर्णय घेण्यात आल्याने मागील वर्षीच्या निधी खर्चावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



पूर्वी जुने लोक म्हणायचे देवाचं भावाचं आणि गावाचं कोणीही खाऊ नये याचं म्हणीचा प्रत्यत श्रीगोंदा तालुक्यातील दिंडी जाणाऱ्या गावात पाहण्यास मिळाला आहे मागील वर्षी बेलवंडी, देवदैठण, घोगरगाव, टाकळी कडेवळीत या गावांना प्रत्येकी १० लाखाचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप संभाजी ब्रिगेड कडून करण्यात आला होता यासाठी संभाजी ब्रिगेडचे श्रीगोंदा तालुकाध्यक्ष शाम जरे यांनी यापूर्वी पायी दिंडी वारीसाठी मंजूर निधीत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला होता. पंढरीच्या वारीसारख्या पवित्र धार्मिक परंपरेसाठी मंजूर झालेल्या शासकीय निधीवर डल्ला मारणे म्हणजे वारकऱ्यांच्या श्रद्धेशी आणि संत परंपरेशी विश्वासघात असल्याची भूमिका त्यांनी मांडली होती.संभाजी ब्रिगेडच्या तक्रारीनंतर जिल्हा परिषद स्तरावर चौकशी समिती नेमण्यात आली. या चौकशीत काही ग्रामसेवकांकडून आर्थिक अनियमितता व नियमबाह्य कामकाज झाल्याचे निष्पन्न झाल्याचा दावा करण्यात आला आहे. चौकशी समितीने कारवाईची शिफारस करूनही दोषींवर कठोर कारवाई न झाल्याने त्यांना राजकीय व प्रशासकीय संरक्षण मिळत असल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. तालुक्यातील बेलवंडी, देवदैठण, घोगरगाव, टाकळी कडेवळीत तसेच श्रीगोंदा शहर परिसरातील निधी खर्चाबाबत खर्चाचे आकडे फुगविणे, बनावट खर्च दाखविणे, मंजुरी प्रक्रियेत अनियमितता आणि जबाबदार अधिकाऱ्यांना चौकशीच्या कक्षेबाहेर ठेवण्याचा प्रयत्न झाल्याचे आरोप करण्यात आले आहेत.

संभाजी ब्रिगेडच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी वरिष्ठस्तरीय चौकशीचे आदेश दिल्याचे सांगण्यात आले आहे. या चौकशीत समोर आलेल्या बाबींमुळेच यंदा निधीत मोठी कपात करण्यात आल्याची चर्चा असून, १० लाखांवरून थेट २ लाखांपर्यंत निधी कमी होणे ही केवळ प्रशासकीय बाब नसून मागील वर्षीच्या निधी वितरण व खर्च प्रक्रियेवरील गंभीर प्रश्न असल्याचे नागरिकांमध्ये बोलले जात आहे.

या प्रकरणातील दोषी ग्रामसेवकांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करावे, संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी संभाजी ब्रिगेडने केली आहे. अन्यथा जिल्हाभर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा तालुकाध्यक्ष शामभाऊ जरे यांनी दिला आहे.

## संतश्री निळोबारायांच्या पालखी मार्गावर अपूर्ण रस्त्याचे 'विघ्न'!

### ठेकेदाराचा मनमानी कारभार आणि प्रशासनाचे दुर्लक्ष; दीड वर्ष उलटूनही कामे रखडलेलीच

**सर्जेराव साळवे। राष्ट्र सह्याद्री**

**बेलवंडी :** श्री क्षेत्र पिंपळनेर येथील संत श्रेष्ठ श्री निळोबारायांचा पालखी सोहळा उद्या, दिनांक ११ जुलै रोजी श्रीगोंदा तालुक्यात दाखल होत आहे. ११ जुलै रोजी पालखीचा मुक्काम देवदैठण येथे, तर १२ जुलै रोजी बेलवंडी येथे असणार आहे. बेलवंडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. मात्र, या सोहळ्याच्या आनंदावर प्रशासकीय अनास्थेचे विरजण पडले आहे. गेल्या दीड वर्षापासून या मार्गावरील रस्त्याचे आणि पुलांचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने, पालखीसोबत असणाऱ्या ३ हजारांहून अधिक वारकऱ्यांना यंदा प्रचंड मनस्ताप सहन करावा लागणार आहे.

> बेलवंडी गावात होणारा रिंगण सोहळा पाहण्यासाठी हजारो भाविक बाहेरगावातून येत असतात, यंदाही रिंगण सोहळा भव्य दिव्य होणार असून ग्रामस्थांच्या वतीने तयारी पूर्ण झाली असून भाविकांनी सायं. ४ वा.उपस्थित राहावे.
>
> **– ऋषिकेश शेलार (सरपंच, बेलवंडी)**

या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होईल आणि यंदाचा पालखी सोहळा सुकर होईल, अशी आशा वारकऱ्यांना व स्थानिक नागरिकांना होती. परंतु, ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे आणि नियोजनाच्या अभावामुळे रस्ता व पुलांची कामे अद्यापही रडतखडत सुरू आहेत. सर्वच ठिकाणच्या पुलांची कामे अर्धवट असल्याने पावसाळ्याच्या दिवसांत इथून प्रवास करणे म्हणजे अपघाताला आमंत्रण देण्यासारखे झाले आहे.



> दिंडीतील भाविकांना वाहतुकीचा त्रास होऊ नये आणि सुरक्षित प्रवास होण्यासाठी बेलवंडी पोलीस यांचेकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार असून सुरक्षेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना केल्या आहेत.
>
> **–नंदकुमार सोनवलकर (सहा.पोलीस निरीक्षक, बेलवंडी पोलीस ठाणे)**

रस्त्याच्या दोन्ही बाजू बेलवंडी हद्दीतील गणपती मळ्यापर्यंत पूर्ण झाले असले तरी रस्त्याला आवश्यक असणाऱ्या साईड पट्ट्यांवर मुरूम भरण्याचे कामही अद्याप बाकी आहे. उद्या पालखी सोहळ्यात गर्दी असताना किंवा वाहनांची ये-जा सुरू असताना एखादी अनुचित घटना किंवा अपघात घडल्यास, याची जबाबदारी नेमकी कोणाची? ठेकेदाराची की सुस्त प्रशासनाची? असा संतप्त सवाल भाविक विचारत आहेत.

## ज्ञानेश्वर माऊली महाराजांच्या दिंडीचे नगरमध्ये आगमन !

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** श्री सिद्धेश्वर आश्रम गणपुर बेलदारवाडी, कोदगाव चाळीसगाव येथील ह भ प ज्ञानेश्वर माऊली बेलदारवाडी यांच्या दिंडीचे अहिल्यानगर येथे आगमन होणार आहे. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी आज भागवत एकादशीच्या निमित्ताने अहिल्यानगरच्या महासैनिक लॉन्स जुन्या कलेक्टर ऑफिसजवळ या दिंडीचे आगमन होणार आहे. सकाळी ११ वा.पासून विविध कार्यक्रम होणार आहे. यावेळी दिंडीचे स्वागत करण्यात येऊन रिंगण पालखी दर्शन सोहळा होईल. त्यानंतर भागवती निरूपण, महाआरती होणार आहे. यावेळी महाप्रसादाचे आयोजन केले आहे. यामध्ये डॉ. अनिल कुऱ्हाडे यांच्यावतीने वैद्यकीय सहाय्यसेवेचे आयोजन केले आहे. यावेळी प्रवीण परदेशी, अवधूत कुक्कडवाल, संतोष छल्लारे, महेश छल्लारे, अरविंद कुक्कडवाल, संजय कुक्कडवाल, ऋषिकेश कुक्कडवाल, पुरुषोत्तम छल्लारे, सागर कुक्कडवाल, प्रतीक कुक्कडवाल, अश्विनी छल्लारे, यांच्यासह नगर बेलदार समाज बांधव या कार्यक्रमासाठी प्रयत्नशील आहेत.

## जाहिर प्रगटन

**तहसिल कार्यालय नेवासा**

**क्रमांक:/जन्म-मृत्यु/एसआर/२०६/२०२६**
**नेवासा दिनांक. १०/०७/२०२६**

**अर्जदार श्री/श्रीम-वसंतराव भाऊसाहेब देशमुख रा. कुकाणा ता. नेवासा** यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./ कु. वसंतराव भाऊसाहेब देशमुख रा. कुकाणा ता.नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. **सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ.क्र. | जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | वसंतराव भाऊसाहेब देशमुख | कुकाणा | १९/०३/१९६१ |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
कार्यकारी दंडाधिकारी नेवासा

द • ख • ल

## आणे येथे तरुणाचा धारदार शस्त्राने सपासप वार करून निर्घृण खून

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** आणे (ता. जुन्नर )गावात फेसबुकवरील ओळखीचा आणि छोट्या कारणांचा राग मनात धरून एका माथेफिरूने एका घरात घुसून ३८ वर्षीय तरुणाचा धारदार शस्त्राने सपासप वार करून निघृण खून केल्याची घटना घडली आहे. तुषार रामदास दाते (वय ३८, रा. आणे) असे मृत तरुणाचे नाव असून याप्रकरणी त्यांची पत्नी सविता दाते यांनी आळेफाटा पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी मनोज महादेव हांडे (रा. चैतन्यपूर, अकोले) याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आळेफाटा पोलिसांनी आरोपीला आणेपरिसरातूनच ताब्यात घेतले असून, त्याने कीटकनाशक प्राशन केल्याची प्राथमिक समोर आली आहे.बुधवार, दि. ८ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास तुषार दाते गाईंना चारा घालण्यासाठी घराच्या पाठीमागे असलेल्या शेताकडे गेले होते. याच वेळी दबा धरून बसलेला आरोपी मनोज हांडे याने मागून येत तुषार यांच्यावर धारदार शस्त्राने पाठीवर, पोटात आणि छातीवर गंभीर सपासप वार केले.तुषार यांचा ओरडण्याचा आवाज ऐकून पत्नी सविता धावून देखील धावून आल्या. त्यांनी जिवाची पर्वा न करता आरोपी कडील धारदार शत्र पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपीने त्यांच्यावरही त्याने हत्यार उगारल्याने त्यांनी आरडाओरडा केला. नातेवाईक धावून येत असल्याचे पाहून हांडे याने पळ काढला.

## धामणीत बिबट्याचा वावर वाढला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील बोऱ्हाडे मळा परिसरात बुधवार ( दि.८ ) रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास बिबट्याने पाळीव कुत्र्यावर हल्ला करून त्याला उचलून नेल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धामणी येथील संदीपआण्णा बोऱ्हाडे यांच्या घराजवळ हा प्रकार घडला. वनविभागाला माहिती मिळताच वनविभागाचे अस्मिता शिंदे, बिबट शिघ्र कृती दल तसेच गावडेवाडी येथील बेस कॅम्पचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सदर परिसराची पाहणी करून नागरिकांना आवश्यक त्या सूचना दिल्या.यावेळी धामणी गावच्या लोकनियुक्त सरपंच प्रतीक्षाताई राजेंद्र जाधव पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आंबेगाव तालुका सरचिटणीस भाऊसाहेब करंडे, किरण गाढवे, पंडित जाधव तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. वनविभागाने नागरिकांना रात्रीच्या वेळी एकटे बाहेर न जाण्याचा, पाळीव जनावरांची सुरक्षित व्यवस्था करण्याचा तसेच बिबट्याचा वावर आढळल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे

## रक्षा पेन्शन समाधान आयोजन १७ व १८ जुलै रोजी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** रक्षा लेखा प्रधान नियंत्रक (पेन्शन) पुणे यांच्या वतीने १७ व १८ जुलै २०२६ रोजी पेन्शन अदालत व 'रक्षा पेन्शन समाधान आयोजन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम बीईजी सेंटर, खडकी, पुणे येथील जीएफ गेट परिसरात सकाळी १० वाजता होणार आहे. माजी सैनिक, वीरपत्नी, वीरपिता, वीरमाता, विधवा पत्नी यांनी पीपीओ, आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक, नोंदणीकृत मोबाईल तसेच इतर आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे. कार्यक्रमात पेन्शनधारकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यात येणार असून संबंधितांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे यांनी केले आहे.

## दुधाविरे खिंडीमधील वाहतूक बंद करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश जारी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मावळ तालुक्यातील दुधाविरे खिंडीमध्ये सुरक्षा जाळी बसविण्याचे काम सुरु असल्याने नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या विचार करता खिंडीमधील वाहतूक पूर्णपणे बंद करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आदेश जारी केले आहेत. मुंबईकडून पवनानगर येथे येणारी सर्व वाहतूक लोणावळा- कुमार चौक भुशी धरण-घुसळखांब-जवण मार्ग मुळशी- पवनानगर अशी वळविणेत येत आहे. (एकूण अंतर जवण पर्यत ३४.४० कि. मी, पवना धरण पर्यंत ४२.४० कि.मी) तसेच पुणे शहराकडील पवनानगर येथे येणारे पर्यटकांची व स्थानिक रहिवाशी यांची संपुर्ण वाहतुक लोणावळा येथे जाण्याकरिता पुढीलप्रमाणे पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ सोमाटणे फाटा- कडधे-पवना धरण (एकुण अंतर २२.१० कि.मी), कामशेत खडाकळे-काळे कॉलनी- पवना धरण (एकूण अंतर १३.७१ कि.मी) तसेच चांदणी चौक- पौड फाटा-कार्शिंग-जवण- पवनानगर (एकूण अंतर ३६.३० कि.मी) अशा प्रकारे वळविण्यात आली असून नागरिकांनी या पर्यायी मार्गाचा वापर करावा,असे आवाहन प्रशासनाच्या करण्यात येत आहे.

## इंडिया स्किल्स स्पर्धा २०२६-२७ साठी ऑनलाइन नोंदणी सुरू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** कुशल युवकांना आपल्या कौशल्याचे राष्ट्रीय स्तरावर प्रदर्शन करण्याची संधी देणाऱ्या स्पर्धेतून उत्कृष्ट उमेदवारांची निवड करून त्यांना पुढे थीश्रवडझ्ळश्री सारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. भारत सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली तसेच नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या सहकार्याने इंडिया स्किल्स स्पर्धा २०२६-२७ आयोजित करण्यात येत असून, या स्पर्धे साठी ऑनलाइन नोंदणी सुरू झाली आहे.या स्पर्धेसाठी जिल्हा, विभाग, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी वयोमर्यादा हा प्रमुख पात्रता निकष असून ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, एअरक्राफ्ट मेंटेनन्स , क्लाउड कॉम्प्युटिंग, डेंटल प्रोस्थेटिक्स, डिजिटल कन्स्ट्रक्शन, इंडस्ट्रियल डिझाईन टेक्नॉलॉजी, आयसीटी नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर, ऑप्टोइलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी, वॉटर टेक्नॉलॉजी, सायबर सिक्युरिटी, इंडस्ट्री ४.०, मेकॅट्रॉनिक्स आणि रोबोट सिस्टिम्स इंटिग्रेशन या कौशल्य क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे. इतर ५० कौशल्य क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००६ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे.शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, एमएसएमई, तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये, कौशल्य प्रशिक्षण संस्था, विद्यापीठे तसेच इतर शैक्षणिक संस्थांमधील पात्र उमेदवारांना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in/G$ या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करावी

# पालखी सोहळ्यासाठी सासवड नगरपरिषद सज्ज

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील सासवड शहरात श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे ११ जुलै रोजी आगमन होणार असून १२ जुलै रोजी मुक्काम आणि १३ जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. तसेच श्री संत सोपानकाका महाराज व श्री संत चांगावटेश्वर महाराज यांच्या पालख्याही १२ जुलै रोजी सासवडमधून पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहेत. नगराध्यक्ष आनंदीकाकी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने पालखी सोहळ्याच्या स्वागताकरिता व वारकऱ्यांना सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता नगरपरिषद सज्ज आहे, अशी माहिती मुख्याधिकारी कैलास चव्हाण यांनी दिली आहे.

**स्वच्छता व आरोग्य व्यवस्था :** निर्मलवारी अभियानांतर्गत सुमारे १ हजार ८०० आसनी फायबर शौचालयांची उभारणी विविध ठिकाणी करण्यात आली आहे. पालखी तळ परिसराची संपूर्ण स्वच्छता, स्वच्छतागृहांची दुरुस्ती, पाणी व वीज व्यवस्था करण्यात आली आहे. शहरातील स्वच्छता, फॉगिंग, पालखी मार्गावरील स्वच्छता यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. जंतूनाशक व तणनाशक साठा उपलब्ध करून फवारणी सुरू आहे. तात्पुरती स्नानगृहे उभारली जाणार असून दोन ठिकाणी जर्मन हँगरची व्यवस्था करण्यात आली आहे.

प्लास्टिक बंदीसंदर्भात आस्थापनांना नोटिसा देण्यात आल्या असून स्टॉलधारकांना कचरा संकलनासाठी पिशव्या व कचरापेटी ठेवण्यात येणार आहेत. पालखी प्रस्थानानंतर शहरात पुन्हा जंतुनाशक फवारणी केली जाणार आहे. शाळा, हॉटेल, ढाबे यांची स्वच्छता व तपासणी करण्यात येत आहे. मच्छी व मटण विक्रेत्यांना तात्पुरते दुकान बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**पाणीपुरवठा व अग्निशमन व्यवस्था :** पाणीपुरवठ्यांसाठी १२ विहिरींवर टँकर भरण्याची व्यवस्था करण्यासोबतच पाण्याचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. ब्लिचिंग पावडर टाकण्याची व्यवस्था, पंपिंग यंत्रणा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक दक्षता घेतली आहे. अखंड वीजपुरवठ्यासाठी महावितरणला पत्रव्यवहार करण्यात आला आहे. अग्निशमन दलाचे वाहन, टँकर व तात्काळ प्रतिसाद पथक सज्ज ठेवण्यात आले आहे.

**विद्युत व्यवस्था :** शहरातील सर्व स्ट्रीट लाईट कार्यान्वित राहतील यासाठी नियोजन करण्यात आले आहे. पालखी मार्ग, पालखी तळ व सोपानदेव मंदिर परिसरात विद्युत व्यवस्था व हायमास्ट दिवे बसविण्यात आले आहेत. जनरेटरची व्यवस्था करण्यात आली असून विद्युत तारा व झाडांच्या फांद्यांची छाटणी करून सुरक्षितता सुनिश्चित करण्यात येत आहे.

**बांधकाम व नगररचना :** पालखी तळाचे सपाटीकरण, पाणी साचू नये यासाठी उपाययोजना, मुरूम भरणे व दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. पालखी मार्गावरील अतिक्रमणे हटविणे, खड्डे बुजविणे व रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्याचे काम सुरू आहे. अनधिकृत होर्डिंग्ज काढण्याची कारवाई करण्यात येत आहे.

**सीसीटीव्ही व एलईडी व्यवस्था :** सुरक्षिततेसाठी पालखी तळावर सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात आली असून भाविकांसाठी एलईडी स्क्रीन बसविण्यात येणार आहेत. नियंत्रण कक्षात दूरध्वनी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे.

**स्वागत, निरोप व पूजा व्यवस्था :** संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे स्वागत तसेच संत सोपानदेव व संत चांगावटेश्वर महाराज पालखीचा निरोप कार्यक्रमासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. पालखीतील पादुकांची महापूजा नगरपरिषदेच्या वतीने करण्यात येणार आहे.

**शाळा व हिरकणी कक्ष :** दिंडी प्रमुखांच्या मागणीनुसार शाळा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन येथे हिरकणी कक्ष स्थापन करून महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**नियंत्रण कक्ष :** पालखी तळाशेजारी व नगरपालिका कार्यालयासमोर असे दोन नियंत्रण कक्ष उभारण्यात आले असून ते २४ तास कार्यरत राहतील. प्राथमिक उपचार सुविधा उपलब्ध राहणार आहे. पुरुष व महिला भाविकांसाठी स्वतंत्र रांगा व बॅरिकेटिंग व्यवस्था करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेने पालखी सोहळ्याच्या नियोजनासाठी १८५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून विविध विभागांच्या माध्यमातून व्यापक तयारी करण्यात आली आहे. दिवेनाका येथे पालखीचे स्वागत तर जेजुरी नाका येथे निरोप देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांना सुलभ सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शहरात दिशादर्शक फलक लावण्यात येत आहेत, अशी माहिती नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कैलास चव्हाण यांनी दिली आहे.

## खैर चोरीचे गूढ कायम, वनविभागाची लाखोंची वसाहतीची इमारत धूळखात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मंचर :** मंचर वनपरिक्षेत्रात वनसंपत्तीच्या संरक्षणाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून एका बाजूला खैर वृक्षांची मोठ्या प्रमाणावर चोरी झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत, तर दुसऱ्या बाजूला शासनाने लाखो रुपये खर्च करून उभारलेली वनकर्मचारी वसाहत रिकामीच पडून असल्याचे चित्र आहे. त्यामुळे वनविभागाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.काही महिन्यांपूर्वी मंचर वनपरिक्षेत्रातील शिंगवे व काठापूर गावांच्या परिसरात वनविभागाच्या हद्दीतील खैर वृक्षांची मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर तोड व चोरी झाल्याची घटना उघडकीस आली होती. खैर हे आर्थिकदृष्ट्या मौल्यवान झाड असल्याने या चोरीमुळे शासनाचे मोठे नुकसान झाल्याचे बोलले जात आहे. मात्र, या प्रकरणातील संबंधित आरोपींवर अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे खैरचोर अजूनही मोकाट असून वनसंपत्तीच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, वनविभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी शासनाने लाखो रुपये खर्च करून निवासी वसाहतीचे बांधकाम केले आहे. या वसाहतीमुळे वनकर्मचाऱ्यांना कार्यक्षेत्रात राहून वनसंरक्षणाची जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडता येईल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात या वसाहतीत एकही कर्मचारी किंवा अधिकारी वास्तव्यास राहत नसल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शासकीय निवासस्थानी राहण्याबाबत आदेश दिले असतानाही काही कर्मचारी व अधिकारी बाहेरगावी किंवा शहरातील खासगी निवासस्थानी राहत असल्याचे सांगितले जात आहे. परिणामी, शासनाचा लाखो रुपयांचा खर्च करून उभारलेल्या इमारती रिकाम्या पडून आहेत. वनकर्मचारी कार्यक्षेत्रात राहत नसल्याने वनक्षेत्रावर प्रभावी देखरेख ठेवण्यात अडचणी येत असल्याचीही चर्चा आहे. एकीकडे वनसंपत्तीची चोरी होत असताना आणि दुसरीकडे वनकर्मचाऱ्यांसाठी उभारलेली वसाहत वापराविना पडून असताना वनसंरक्षणाच्या उपाययोजनांवर प्रश्न उपस्थित होत आहेत. खैर चोरी प्रकरणाचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच रिकाम्या पडलेल्या शासकीय वसाहतींचा वापर सुनिश्चित करण्यासाठी वरिष्ठ स्तरावरून तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे

## 'दगडूशेठ' तर्फे २७ हजार वारकऱ्यांची आरोग्य व नेत्र तपासणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** : रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद अंगिकारुन कार्यरत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळतर्फे जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत उत्सवाची पारंपरिक जागा असलेल्या जय गणेश प्रांगण येथे वारक-यांसाठी आयोजित आरोग्य व नेत्र तपासणी शिबीरात २७ हजार ५६४ हून अधिक वारक-यांची तपासणी करण्यात आली. तसेच मंदिर परिसरात तब्बल २५ हजार वारक-यांना सकाळचा नाश्ता व चहा देखील देण्यात आला.

आरोग्य शिबीर प्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, मंगेश सूर्यवंशी, सचिन आखाडे, राजाभाऊ पायमोडे, राजाभाऊ घोडके, राजाभाऊ सूर्यवंशी, रुणाल केसरकर, प्रदीप ढवळे, मनोज वाळुंजकर, सुनील जाधव, विजय कोंढाळकर, ट्रस्टचे वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी तसेच सुवर्णयुग तरुण मंडळ आणि सुवर्णयुग सहकारी बँकेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत ट्रस्टच्या आरोग्यसेवेच्या कार्यात वारक-यांसाठी



आरोग्य व नेत्र तपासणी शिबीर हा एक भाग आहे. या आरोग्य शिबीरात डोळ्यांची तपासणी, ११ हजार ५०० भाविकांना चष्मेवाटप यांसह वारक-यांना प्रवासा दरम्यान येणा-या विविध आरोग्यविषयक अडचणींची तपासणी करण्यात आली. अंगदुखी, डोकेदुखी, बीपी, शुगर यांसारख्या आजारांवर विनामूल्य औषधे देखील देण्यात आली. अंगदुखी, पाठदुखी साठी ॲक्युप्रेशर थेरपी, प्रथमोपचार देखील करण्यात आले. तसेच ज्यांना नेत्र शस्त्रक्रियेची आवश्यकता असेल, त्यांना विनामूल्य शस्त्रक्रिया करुन देण्यात येणार आहे. शिबीरात डॉक्टर व स्वयंसेवक मिळून २७५ जणांनी सहभाग घेतला. शिबीरात सत्यसाई सेवा ऑर्गनायझेशन, तेजोमयी आय केअर, रेणुका नेत्रालय, सूर्य सह्याद्री हॉस्पिटल कसबा पेठ, सद्गुरु शंकर महाराज मठ अन्नछत्र समिती, सिल्व्हर बर्च मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, देशपाडे आय केअर कोथरुड आदी संस्थांनी सहभाग घेतला.

## आषाढी वारीनिमित्त कलाकारांची भव्य दिंडी उत्साहात संपन्न

**पुणे :** आषाढी वारीचे औचित्य साधून अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ आणि बालगंधर्व परिवार ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली भव्य कलाकार दिंडी आज पुण्यात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या जल्लोषात संपन्न झाली. संतांच्या चरणी कलेच्या संगतीने! या संकल्पनेवर आधारित या दिंडीत चित्रपट, नाटक, संगीत, नृत्य तसेच विविध कला क्षेत्रातील अनेक नामवंत कलाकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विठ्ठल नामाचा अखंड गजर, अभंग, टाळ-मृदुंगाचा निनाद आणि भगव्या पताकांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.



या भव्य कलाकार दिंडीतून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त वारी, जलसंधारण तसेच सामाजिक ऐक्य आणि सामाजिक बांधिलकी यांसारखे महत्त्वपूर्ण संदेशही देण्यात आले. कलाकारांनी आपल्या सहभागातून समाजात जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. अध्यात्मासोबत सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यावेळी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, बालरंगभूमीच्या अध्यक्षा नीलम शिर्के-सामंत, चित्रपट महामंडळाचे कायदेशीर सल्लागार ड. मंदार जोशी, ज्येष्ठ अभिनेत्री रजनी भट, जयमाला इनामदार, ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले, भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई, गायक डॉ. उत्कर्ष शिंदे, राज काझी,वासू पाटील, अजित शिरोळे, अनिल नगरकर, राधा कुलकर्णी, आर्या घाटे यांच्यासह अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे पदाधिकारी व सदस्य तसेच बालगंधर्व परिवार ट्रस्ट पदाधिकारी व सदस्य अनेक कलाकार, मोठ्या संख्येने सहभागी झाले.दिंडीचा शुभारंभ बालगंधर्व रंगमंदिर येथून झाला. त्यानंतर पुणे महानगरपालिका भवन, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर येथे दर्शन घेऊन दिंडी पालखी चौक, नाना पेठ येथे भक्तिमय वातावरणात पोहोचली.या उपक्रमाचे संकल्पनाकार मेघराज राजेभोसले यांनी उपस्थित कलाकार, वारकरी, पदाधिकारी आणि नागरिकांचे आभार मानत, कला, संस्कृती आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडवून आणण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगितले. समाजप्रबोधन, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक मूल्यांचा प्रसार हेही या दिंडीमागील महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यातही अशा सांस्कृतिक, सामाजिक आणि भक्तिमय उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.या भव्य कलाकार दिंडीमुळे पुणे शहरात भक्ती, संस्कृती आणि कलेचा अनोखा मिलाफ अनुभवायला मिळाला. कलाकार आणि वारकरी यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आषाढी वारीचा आध्यात्मिक उत्साह अधिकच द्विगुणित झाला.

## खरेदीसोबत सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर महिला उद्योजिका, बचत गट, स्थानिक कारागीर आणि लघुउद्योजकांना थेट ग्राहकांशी जोडणारा 'अमृत पेठ - थेट बाजारपेठ' हा श्रावण महोत्सव ७, ८ आणि ९ ऑगस्ट २०२६ रोजी कोथरूड येथील गांधी भवनमध्ये आयोजित करण्यात आला आहे. सकाळी १० ते रात्री ९ या वेळेत होणाऱ्या या महोत्सवासाठी प्रवेश विनामूल्य असेल.महोत्सवात महिला बचत गट आणि स्थानिक उद्योजकांनी तयार केलेल्या फॅशन ज्वेलरी, हस्तकला, गृहसजावटीच्या वस्तू, गृहउपयोगी साहित्य, पूजासाहित्य, भेटवस्तू, खाद्यपदार्थ तसेच विविध पारंपरिक उत्पादनांचे शेकडो स्टॉल्स उभारले जाणार आहेत. ग्राहकांना उत्पादकांकडून थेट खरेदीची संधी मिळणार असल्याने दर्जेदार वस्तू वाजवी दरात उपलब्ध होणार आहेत.तीन दिवसांच्या महोत्सवात शाडूच्या गणपती मूर्ती बनविण्याची स्पर्धा, मंगलागौरी खेळ स्पर्धा, श्रावण क्वीन स्पर्धा, चिमुकल्यांसाठी रंग भरा स्पर्धा, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा स्पर्धा व सन्मान सोहळा, तसेच संगीत, नृत्य आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. स्पर्धांतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे, सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे देण्यात येणार आहे.'व्होकल फॉर लोकल' संकल्पनेला प्रोत्साहन देत महिला उद्योजिका, बचत गट आणि स्थानिक कारागिरांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम स्वावलंबी महिलांना नवे व्यासपीठ उपलब्ध करून देणारा ठरणार आहे. खरेदी, मनोरंजन, संस्कृती आणि उद्योजकतेचा संगम असलेल्या या श्रावण महोत्सवाला पुणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, अमृत यांनी केले आहे.

# संतृप्त कचऱ्याच्या आडव्या दाबामुळे मोशीतील इमारत उलटल्याचा प्राथमिक अंदाज

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मोशी येथील दुर्दैवी इमारत दुर्घटनेनंतर प्रोफेशनल स्ट्रक्चरल इंजिनिअर्स असोसिएशन (पीएसईए)चे अध्यक्ष अभियंता शेषराव कदम आणि पीएसईए समितीच्या सदस्यांनी घटनास्थळी भेट देऊन प्राथमिक दृश्य पाहणी केली. या पाहणीनंतर संतृप्त घनकचऱ्यामुळे निर्माण झालेल्या आडव्या दाबामुळे इमारत उलटल्याचा प्राथमिक अंदाज संघटनेने व्यक्त केला आहे.प्रत्यक्ष पाहणीदरम्यान, सततच्या पावसामुळे इमारतीलगत साठविण्यात आलेला घनकचऱ्याचा मोठा ढीग आणि त्याखालील जमीन पूर्णपणे पाण्याने संतृप्त झाल्याचे निदर्शनास आले. हा घनकचरा बाधित इमारतीपासून सुमारे ३० मीटर अंतरावर असल्याचे आढळून आले.

पीएसईएच्या प्राथमिक निरीक्षणानुसार, पावसाच्या पाण्यामुळे घनकचरा आणि त्याखालील मातीची कातरण प्रतिरोधक क्षमता मोठ्या प्रमाणात कमी झाली असावी. परिणामी हा संतृप्त घनकचरा द्रवरूप पदार्थाप्रमाणे इमारतीच्या दिशेने सरकला असण्याची शक्यता आहे.घटनास्थळी पाहणीदरम्यान इमारतीचे मुख्य संरचनात्मक घटक बहुतांश शाबूत असल्याचे दिसून आले. त्यामुळे इमारतीच्या अपुऱ्या



संरचनात्मक क्षमतेमुळे ही दुर्घटना घडली असल्याचे प्राथमिक पाहणीतून आढळून आलेले नाही.

संतृप्त घनकचरा इमारतीमध्ये प्रवेश करून त्याने संरचनेवर मोठ्या प्रमाणात आडवा दाब निर्माण केला. या अतिरिक्त दाबामुळे इमारतीचे संतुलन बिघडून ती उलटली असावी, असा प्राथमिक अंदाज पीएसईएने व्यक्त केला आहे.मात्र, या दुर्घटनेचे नेमके कारण, संतृप्त घनकचऱ्याचा उगम, त्याचा प्रवाह, हालचालीचा मार्ग आणि जमिनीची स्थिती याबाबत अंतिम निष्कर्ष भू-तांत्रिक आणि न्यायवैद्यक अभियांत्रिकी तपासणीनंतरच काढता येईल, असे पीएसईएने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, नैसर्गिक किंवा संरचनात्मक आपत्कालीन परिस्थितींमध्ये तांत्रिक मार्गदर्शन आणि तज्ज्ञांची तत्काळ मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रोफेशनल स्ट्रक्चरल इंजिनिअर्स असोसिएशनने 'पीएसईए आपत्कालीन मदत कक्ष' सुरू केला आहे. या मदत कक्षात अनुभवी संरचनात्मक अभियंते, क्षेत्रीय तज्ज्ञ, निवृत्त पोलीस अधिकारी आणि प्रशासकीय तज्ज्ञांचा समावेश असून, घटनास्थळी तांत्रिक मार्गदर्शन, इमारतींचे प्राथमिक संरचनात्मक मूल्यमापन, नुकसानाचे परीक्षण, संबंधित शासकीय यंत्रणांशी समन्वय आणि आवश्यक तज्ज्ञांची मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही सेवा केवळ पीएसईए सदस्यांसाठी मर्यादित नसून, गरज भासल्यास कोणताही नागरिक, गृहनिर्माण संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा शासकीय विभाग या सेवेचा लाभ घेऊ शकतील, अशी माहिती प्रोफेशनल स्ट्रक्चरल इंजिनिअर्स असोसिएशनचे अध्यक्ष अभियंता शेषराव कदम यांनी दिली. आपत्कालीन मदतीसाठी ९४२०५ २१३०४ आणि ९८२२३ २९४०२ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## द•ख•ल

### वारकऱ्यांच्या सेवेसाठी बाजार समिती व नेप्ती उपबाजार दोन दिवस बंद

**निघोज :** श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यानिमित्त येणाऱ्या हजारो वारकऱ्यांच्या सेवेसाठी कृषि उत्पन्न बाजार समिती व अहिल्यानगरच्या नेप्ती उपबाजारातील सर्व व्यवहार रविवार, दि. १२ जुलै आणि सोमवार, दि. १३ जुलै २०२६ रोजी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. या संदर्भातील आदेश बाजार समितीच्या सचिवांनी जारी केले असून व्यापारी, आडते, भाजीपाला व फळफळावळ व्यावसायिकांना सहकार्याचे आवाहन करण्यात आले आहे.सालाबादप्रमाणे श्री संत निवृत्तीनाथ महाराज यांची पालखी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे प्रस्थान करत असून शनिवार, दि. ११ जुलै आणि रविवार, दि. १२ जुलै या दोन दिवसांसाठी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात मुक्काम करणार आहे. त्यानंतर सोमवार, दि. १३ जुलै रोजी पालखी पुढील प्रवासाला रवाना होणार आहे. श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याच्या निमित्ताने वारकरी सेवेला प्राधान्य देत बाजार समिती प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे. महापालिकेच्या वतीने सुलभ शौचालय, आरोग्य सेवेचे नियोजन करण्यात आले आहे.

### शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी पातकळ : धस उपसभापती



**हातगाव :** शेवगाव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी वरखेड येथील हनुमान बापुराव पातकळ यांची तर उपसभापतिपदी एरंडगाव येथील अशोक अण्णासाहेब धस यांची एकमताने निवड झाली आहे. निवडीनंतर डॉ. क्षितिज घुले, काकासाहेब नरवडे व संजय कोळगे यांनी दोन्हीही नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला असून या निवडीच्या वेळी पंडितराव भोसले,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका प्रमुख कैलासराव नेमाने, ताहेर पटेल,एकनाथ कसाळ,बबनराव भुसारी,गणेश खबरे,सुधाकर लांडे,अंबादास कळमकर, अनिल मडके, अशोकराव मेरड, जमीर पटेल, जाकीर कुरेशी, बाळासाहेब वडघणे, राहुल बेडके,प्रदीप काळे,मनोज तिवारी, राम अंधारे, नगरसेवक संतोष जाधव, अमर पुरणाळे, विकास नन्नवरे, विकास लोखडे, बाळासाहेब मरकड, मंगेश थोरात, भारत मोटकर, संतोष धस, चंद्रकला कातकडे, अर्जुन मडके, रामनाथ लेंडाळ, झिरपे मामा, अभिजित आहेर, अमोल धस, दीपक चोपडे, मोहित पारनेरे, यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### शेतकरी दमदार पावसाच्या प्रतीक्षेत

**एरंडगाव :** नुकत्याच झालेल्या पावसावर शेतकर्यांनी घाई करून पेरण्या उरकण्याचा प्रयत्न केला असला तरी शेवगाव तालुक्यातील खरीप हंगामासाठी शेतकरी दमदार पावसाच्या प्रतिक्षेत आहेत .यंदा सुरुवातीला पावसाने समाधानकारक हजेरी लावल्याने काही भागात पेरण्या सुरू झाल्या होत्या. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने उगवण झालेल्या पिकांनाही फटका बसला आहे. आता पाऊस येता झाला असला तरी तो केवळ रीमझीम स्वरूपाचा आहे. तालुक्यात यंदा सुमारे ६५ हजार ११० हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत ४८हजार २९३हेक्टरवर पेरण्या उरकल्या आहेत. उर्वरित २६ टक्के क्षेत्रावर पेरण्या होणे बाकी आहे. बागायती भागातील विहिरी व बोअरवेलची पाणीपातळीही घटल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. गेल्या वर्षी वेळेवर झालेल्या पावसामुळे खरीप हंगाम चांगला गेला होता. मात्र यंदा पावसाचे प्रमाण कमी झाल्याने उत्पादन घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कपासी पिकाच्या संदर्भात शेवगाव तालुका राज्यात आघाडीवर असून येथे कापसाचे जिनिंग प्रेसिंग कारखानेही तुलनेने अधीक आहेत.

### काकडे माध्यमिक विद्यालयात आरोग्य शिबिर व मार्गदर्शन शिबिर संपन्न



**एरंडगाव :** आबासाहेब काकडे विद्यालय शेवगाव येथे कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंती पंधरवडा समारोह निमित्त आबासाहेब काकडे विद्यालय शेवगाव येथे आरोग्य तपासणी शिबीर व मार्गदर्शन शिबिर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे पर्यवेक्षक पल्हारे सर यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कॉलेज ऑफ फार्मसी बोधेगाव येथील प्रा. खरात दत्ता शिवाजी यांनी भूषविले. त्यांनी रक्तगट व हिमोग्लोबिनचे महत्त्व विद्यार्थ्यांना सखोल उदाहरणे देवून आरोग्याची काळजी घेण्याचा संदेश दिला .प्रा. खरात सरांच्या मार्गदर्शनाखाली बी. फार्मसी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थीनींनी जवळजवळ ३५० इ. ९वी ते १० वीच्या विद्यार्थिनींचे रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी केली. विद्यार्थीनींनीही मोठ्या उत्साहाने या तपासणी शिबिरामध्ये सहभाग नोंदवला. कार्यक्रमा प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून दुसुंगे कविता गोरक्षनाथ, विद्यालयाचे प्राचार्य डॉ.लक्ष्मण बिटाळ, उपमुख्याध्यापक. मगर पर्यवेक्षक गाढे सर उपस्थित होते. हा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडावा यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रागिणी लबडे मॅडम यांनी केले व आभार कोल्हे सर यांनी मानले.

### खेळ व विविध स्पर्धातूनच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडते : लांडे



**ढोरजळगाव :** खेळ आणि विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेत प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःतील क्षमता ओळखून त्यांचा विकास करावा आणि विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन संभाजी लांडे यांनी बोलताना व्यक्त केले. कार्यक्रमासाठी देविदास गिऱ्हे, देविदास पाटेकर, अनंता उकिर्डे, रघुनाथ सातपुते, नवनाथ साबळे, भिवसेन केदार, विद्यालयाचे प्राचार्य संजय चेमटे, पर्यवेक्षिका श्रीमती सुरेखा शेलार, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिवाजी पोटभरे यांनी केले .उपस्थितांचे आभार पांडुरंग व्यवहारे यांनी मानले.

# पुनर्वसुच्या सरींनी पेरणीला दिला वेग!

## दमदार पावसाअभावी धाकधूक कायम

## सोयाबीनच्या क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता १९ गावांची तहान अद्याप टँकरवरच

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**



**नगर तालुका :** नगर तालुक्यात मृग व रोहिणी नक्षत्र कोरडे गेल्यामुळे खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले होते. मूग व उडीदाची पेरणी पावसाअभावी वाया गेली. पुनर्वसु नक्षत्रात सलग तीन दिवस झालेल्या रिमझिम पावसाचा शेतजमिनीत वापसा निर्माण झाला असून नगर तालुक्यात पुन्हा एकदा बळीराजा नव्या आशेने शेतात उतरला आहे. बळीराजांची पेरणीसाठी लगबग सुरू झाली आहे.

पुनर्वसु नक्षत्राच्या सुरुवातीलाच तालुक्यात सर्व दूर कमी अधिक प्रमाणात पावसाने हजेरी लावली. तालुक्यात सर्वत्र पेरणीची लगबग सुरू असून ट्रॅक्टर, पेरणी यंत्रे आणि बैलजोड्यांच्या साहाय्याने शेतकरी दिवसभर पेरणीची कामे करत आहेत. उशिरा झालेल्या पावसामुळे मूग व उडीदाची पेरणी नाममात्र झाली. बळीराजाने सोयाबीन आणि बाजरीच्या पेरणीकडे मोर्चा वळविला आहे. त्यामुळे यंदा तालुक्यात सोयाबीनच्या क्षेत्रात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. काही भागात बाजरी, मका, तूर आणि इतर खरीप पिकांचीही पेरणी सुरू झाली आहे.

पुनर्वसुच्या सरींमुळे पेरणीला वेग आला असला तरी झालेला पाऊस शेतीसाठी पुरेसा नसल्याचे चित्र आहे. तालुक्यात अद्यापही समाधानकारक पाऊस झालेला नाही. अनेक ठिकाणी नद्या, नाले, बंधारे आणि तलाव कोरडेच आहेत. भूजल पातळी वाढेल इतका पाऊस अद्याप झालेला नसल्याने विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीसाठ्यातही अपेक्षित वाढ झालेली नाही.

पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या असून तालुक्यातील १९ गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याने ग्रामीण भागातील परिस्थिती चिंताजनक बनली आहे. पावसाने दडी मारल्यास पाणीटंचाई अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

आगामी पुष्य नक्षत्रात चांगला आणि सलग पाऊस झाल्यास खरीप पिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. सोयाबीन, बाजरी, तूर, मका आदी पिकांची उगवण चांगली होण्यासाठी पुढील आठ-दहा दिवस अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

> मूग-उडीदाची पेरणी पावसाअभावी करता आली नाही. पुनर्वसुच्या सरींवर विश्वास ठेवून सोयाबीन आणि बाजरीची पेरणी करत आहोत. पुढच्या नक्षत्रात दमदार पाऊस झाला तरच खरीप हंगाम हातात येईल. अन्यथा पुन्हा मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागेल.
> **निळु पाटोळे (शेतकरी, जेऊर)**

> पुनर्वसु नक्षत्रातील रिमझिम पावसामुळे पेरणीसाठी वापसा निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांनी स्थानिक परिस्थितीनुसार चांगल्या वाणांची पेरणी करावी. आगामी काळात चांगला पाऊस झाल्यास सोयाबीन व बाजरीसह खरीप पिकांची उगवण समाधानकारक होईल.
> **सुरेखा घोंडगे (सहाय्यक कृषी अधिकारी)**

## धनगरवाडीत भक्ती, सेवाभाव व माणुसकीचा सुंदर संगम !

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**नगर तालुका :** आषाढी वारीच्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर महामार्ग महिन्यापासून विठ्ठलनामाच्या अखंड जयघोषाने दुमदुमून गेला आहे. हजारो वारकरी विठुरायाच्या दर्शनासाठी या मार्गाने पंढरपूरकडे प्रस्थान करत असतात. ऊन, वारा, पाऊस यांची पर्वा न करता भक्तिरसात तल्लीन होऊन वारकरी आपल्या श्रद्धेचा प्रवास पूर्ण करत आहेत. अशा विठ्ठलभक्त वारकऱ्यांच्या सेवेसाठी धनगरवाडी येथे संतुकनाथ सेवा मंडळ व संतुकनाथ गोशाळेच्या वतीने उभारण्यात आलेले वारकरी मदत केंद्र भाविकांसाठी मोठा आधार ठरत आहे.

वारकरी मदत केंद्रात वारकऱ्यांना चहा, नाश्ता, प्राथमिक वैद्यकीय उपचार, पिण्याचे शुद्ध पाणी तसेच विश्रांतीची सुविधा चोवीस तास उपलब्ध करून दिली जात आहे. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान आणि त्यांच्या ओठांवरील विठ्ठल.. विठ्ठल.. हा गजर स्वयंसेवकांनाही सेवाकार्यात अधिक प्रेरणा देत आहे.

जेऊर पंचक्रोशीतील अनेक युवक सकाळपासून रात्री उशिरापर्यंत मदत केंद्रात उपस्थित राहून वारकऱ्यांची सेवा करत आहेत. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा ही भावना मनात ठेवून प्रत्येक स्वयंसेवक अत्यंत आपुलकीने भाविकांची सेवा करताना दिसून येतो. या सेवेमुळे मनाला मोठे समाधान लाभत असल्याची भावना स्वयंसेवकांनी व्यक्त केली. वारकरी मदत केंद्राचे तिसरे वर्ष असून पंचक्रोशीतील ग्रामस्थ, दानशूर नागरिक आणि युवकांचे मोलाचे सहकार्य या उपक्रमाला लाभत आहे. संतुकनाथ सेवा मंडळ व संतुकनाथ गोशाळा वर्षभर विविध सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी उपक्रम राबवत असून वारकरी सेवेचा हा उपक्रम त्यातीलच एक प्रेरणादायी उपक्रम मानला जात आहे. भक्ती, सेवा आणि माणुसकी यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमाचे पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडूनही कौतुक होत आहे. विठुरायाच्या चरणी सेवा अर्पण करण्याचा हा प्रयत्न अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## राज्यभर धाडी ; कोरडगावात मावा माफियांचा धुमाकूळ!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** महाराष्ट्रभर अवैध व्यवसायांवर धडक कारवाया सुरू असताना कोरडगावात मात्र सुगंधित माव्याचा कथित अवैध व्यापार दिवसेंदिवस फोफावत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. पहाटे पाच वाजताच गावात मावा खरेदीसाठी टपरीधारकांच्या दुचाकींच्या रांगा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत असल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे हा अवैध व्यवसाय इतक्या उघडपणे सुरू असताना संबंधित यंत्रणा नेमके काय करत आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कोरड गावात मशीनवर तयार होणारा, व तयार शेवगाव येथून मोठ्या प्रमाणावर सुगंधित माव्याचे पार्सल कोरडगावात पोहोचते. त्यानंतर आखेगाव, तोंडोळी, कळसपिंप्री, कोळसांगवी, जिरेवाडी, सोनोशी, कोनोशी, दैत्यनांदूर, टाकळी फाटा, अकोला, जळगाव, शेकटे आदी गावांतील टपरीधारक येथे मावा खरेदी करून चढ्या भावाने विक्री करतात, असा आरोप होत आहे. राज्यात अवैध धंद्यांविरोधात तुकाराम मुंढे यांच्या पथकाकडून धाडसत्र सुरू असल्याची चर्चा असताना, कोरडगावात मात्र हा कथित अवैध व्यापार बिनधास्त सुरू असल्याने या मावा रॅकेटला अभय कोणाचे? हा प्रश्न आता गावागावात चर्चेचा विषय बनला आहे.

सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे, अनेक टपऱ्या बंद असल्याचे भासवले जात असले तरी मागच्या दारातून माव्याची विक्री सुरू असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

त्यामुळे टपऱ्या बंद... मावा धडाक्यात! असे चित्र निर्माण झाल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. स्थानिकांच्या आरोपानुसार, संबंधित परिसरातून पोलीस यंत्रणेची ये-जा नियमित असतानाही ठोस कारवाई दिसत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय अशी उपरोधिक प्रतिक्रिया गावात व्यक्त केली जात आहे.

सुगंधित माव्याच्या वाढत्या वापरामुळे तरुण पिढी व्यसनाच्या गर्तेत ओढली जात असून त्यांच्या आरोग्याशी गंभीर स्वरूपाचा खेळ सुरू असल्याची चिंता व्यक्त होत आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन, पोलीस विभाग आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्त धडक कारवाई करून या कथित अवैध साखळीचा पर्दाफाश करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

आता प्रश्न एकच - राज्यभर धाडी पडत असताना कोरडगावातील या कथित मावा व्यापारावर कारवाई कधी होणार?

### पहाटे पाचपासून माव्याच्या खरेदीसाठी टपरीधारकांची गर्दी; ‘अभय’ कुणाचे? नागरिकांचा संतप्त सवाल

## टाळ-मृदंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात भाविक तल्लीन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**खरवंडी कासार :** या संत एकनाथ महाराजांच्या अभंगाच्या गजरात शांतीब्रह्म संत एकनाथ महाराजांच्या दिंडी सोहळ्याचे मंगळवारी मिडसांगवी येथे आगमन झाले. हरिनामाच्या जयघोषात आणि टाळ-मृदंगाच्या गजरात पार पडलेल्या या दिंडी सोहळ्याचा पहिला लक्षवेधी रिंगण सोहळा येथे संपन्न झाला. हा सोहळा पाहण्यासाठी भगवानगड परिसरातील हजारो भाविक, भक्त आणि ग्रामस्थांनी गर्दी केली होती.

पायी वारीच्या पहिल्याच टप्प्यावर संत एकनाथ महाराजाच्या पादुका दर्शनाने भारावून गेलेल्या वारकऱ्यांच्या डोळ्यात पंढरीच्या विठ्ठलाला भेटण्याची ओढ स्पष्ट दिसत होती.

प्रशासनाकडून शाही स्वागत, प्रांताधिकारी प्रसाद मते ,तहसीलदार उद्धव नाईक सहाय्यक आयुक्त डॉ.सीमा रासकर,सह पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, डॉ नवनाथ भाबड, मंडळ अधिकारी सोनवणे मॅडम,तलाठी निलवडे, कदम मॅडम,ग्रामसेवक दातीर भाऊसाहेब यांनी स्वागत केले तर गावच्या वतिने सालसिद्ध बाबा संस्थांचे महंत हनुमंत महाराज शास्त्री सरपंच भगवान हजारे विष्णु थोरात दत्तात्रय पठाडे बापूसाहेब पठाडे जेष्ठ ग्रामस्थानी पालखी चे स्वागत केले यावेळी परिसरातील सर्व भाविक हजर होते.

यंदा संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याचे ४२९ वे वर्ष आहे. या ऐतिहासिक वर्षानिमित्त संतांच्या पादुका आणि पालखीसाठी चांदीचा नवा रथ सजवण्यात आला आहे. पंढरपूरमध्ये या पालखीला ३ नंबरचा मान आहे. या रथाच्या पुढे ३ आणि मागे ४३ दिंड्या पंढरीच्या दिशेने मार्गस्थ आहेत. टाळांच्या ठेक्यावर आणि हरी विठ्ठल च्या नामघोषात रिंगण सोहळा उत्साहात पार पडला. सायंकाळी मुंगुसवाडे येथे मुक्कामानंतर आज सकाळी पालखीने शिरूर तालुक्यात प्रस्थान केले. वारकऱ्यांसाठी सेवाभाव, पायी चालणाऱ्या भाविकांसाठी खरवंडी कासार प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने मोफत औषध किटचे वाटप करण्यात आले. तसेच दिंडीतील सर्व भाविकांसाठी बाबुराव पठाडे. यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. पैठणहून निघाल्यानंतर पहिल्या रिंगण सोहळ्याचा मान मिडसांगवीला असल्याने गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. या गावच्या लहाणा पासुन जेष्ठ व्यक्ति यांच्यासह परिसरातिल ग्रामस्थ उपस्थित होते.

## आत्मविजयातुनच यशाचा मार्ग : डॉ. मालपाणी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** भगवद्गीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून मानवी जीवनाला दिशा देणारे 'विजयाचे शास्त्र' आहे. जीवनातील कोणत्याही संघर्षात यशस्वी व्हायचे असेल, तर प्रथम स्वतःच्या मनावर विजय मिळवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मालपाणी उद्योग समूहाचे प्रमुख डॉ. संजय मालपाणी यांनी केले.

कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. यावेळी कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ड. शिवाजीराव काकडे, शिवसेना नेत्या तथा माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. हर्षदा काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मण बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंग काकडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

काम, क्रोध आणि लोभ हे मनुष्याचे सर्वात मोठे शत्रू आहेत. त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी मनावर ताबा आवश्यक आहे. मन शांत आणि विचार शुद्ध झाले की विकार आपोआप दूर होतात. विद्यार्थ्यांनी योग, सकारात्मक विचार आणि आत्मशिस्त यांचा अंगीकार केल्यास यश निश्चित मिळते असा उपदेश देत परीक्षेचा ताण न घेता आत्मविश्वासाने आणि आनंदी वृत्तीने प्रत्येक आव्हानाला सामोरे जावे. अपयश आले तरी खचून न जाता नव्या उमेदीने उभे राहणे, ऐकण्याची सवय लावणे आणि सातत्यपूर्ण प्रयत्न करणे हेच यशाचे खरे सूत्र आहे. भगवद्गीतेचा संदेश प्रत्येक विद्यार्थ्याला आत्मविकास आणि जीवनविजयाचा मार्ग दाखवणारा असल्याचा सल्ला डॉ.मालपाणी यांनी यावेळी बोलताना दिला.

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी मानवाला कर्तव्य, नेतृत्व, संस्कार, राष्ट्रनिर्मिती आणि जीवनमूल्यांचा अनमोल संदेश दिला आहे.

## श्रीगोंदातील डॉक्टरांकडून डोंबिवली हल्ल्याचा निषेध

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** डोंबिवली येथे डॉक्टर व पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांवर झालेल्या मारहाणीच्या घटनेचा श्रीगोंदा मेडिकल असोसिएशनने तीव्र निषेध नोंदवत डॉक्टर संरक्षण कायद्याची कठोर व प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भातील निवेदन श्रीगोंदा पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, डॉक्टर, परिचारिका आणि इतर वैद्यकीय कर्मचारी हे आरोग्य व्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ असून ते दिवस-रात्र रुग्णसेवेसाठी कार्यरत असतात. यावेळी डॉ. राजेश पाखरे, डॉ. प्रमोद गायकवाड, डॉ. बबन चव्हाण, डॉ. विक्रम कसरे, डॉ. राजेंद्र सिदनकर, डॉ. संतोष मोटे, डॉ. रविराज मचे, डॉ. चैताली मखरे, डॉ. मखरे, डॉ. अनिल कोकाटे, डॉ. पांडुरंग दातीर, डॉ. संजय टकले, डॉ. निलेश पाटील, डॉ. बाळासाहेब पवार, डॉ. अनिल शिंदे यांच्यासह डॉक्टर उपस्थित होते.

## विविध मागण्यांसाठी ११ तारखेला अकोलकर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा : प्रा. चव्हाण

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजामध्ये जातीय तेढ व तणाव वाढवणाऱ्या आरोपी विरुद्ध देशद्रोहाच्या गुन्ह्यासह ट्रॉसिटी क्ट व अन्य गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करून फास्टट्रॅक कोर्टात कामकाज चालवावे. आरोपीला जाहीररीत्या रस्त्यावरून मिरवावे., अन्यथा येत्या ११ तारखेला विष्णुपंत अकोलकर यांचे नेतृत्वाखाली पोलीस स्टेशनवर मोर्चा काढू , असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते प्रा. किसन चव्हाण यांनी दिला.

दोन दिवसांपूर्वी सोशल मीडियावर छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांच्या बद्दल अश्लील, बदनामीकारक व अवमानकारक मजकूर तालुक्यातील शिरसाटवाडी येथील शेतकरी देविदास शिरसाठ यांच्या अकाउंट वरून प्रसिद्ध झाला. याच्या तीव्र प्रतिक्रिया सर्वत्र उमटून तालुक्यामध्ये तणाव वाढला. तपास यंत्रणांनी तालुक्यातील मोहोज येथील सुरज वांढेकर या व्यक्तीला तांत्रिक तपासाच्या आधारे तपासात घेतले. चौकशी दरम्यान संबंधित व्यक्तीने गुन्हा कबूल केल्यानंतर त्याचे विरुद्ध विविध कलमान्वये पोलिसांनी गुन्हा दाखल केला. वंजारी समाजाच्या सर्वसामान्य माणसाच्या खांद्यावर बंदूक ठेवत मराठा समाजाच्या व्यक्तीने अकाउंट हॅक करत पोस्ट टाकल्याचे सिद्ध होताच ओबीसी बहुल कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशनवर मोर्चा काढत विविध मागण्या मांडल्या.

यावेळी आम आदमी पार्टीचे प्रा .किसन चव्हाण, किरण पालवे, महेश अंगारखे ,प्रा सुनील पाखरे, कानिफनाथ देवस्थानचे माजी अध्यक्ष संजय मरकड, येळी गावचे माजी सरपंच संजय बडे, अनंत कराड, माऊली कोंगे, अक्षय शिरसाट, जनार्दन शिरसाट, पप्पू पालवे, आदींसह शिरसाटवाडी व शहरातील विविध प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रमुख मार्गदर्शक प्रा. किसन चव्हाण म्हणाले, तालुक्याच्या सार्वजनिक जीवनात विष टाकण्याचे काम काही प्रवृत्ती कडून होत आहे. आरशाची काच फुटली आहे ही वस्तुस्थिती असली, तरी कोणाच्या दगडाने काच फुटली, याच्या मागचा मेंदू कोणाचा आहे, याचाही तपास या निमित्ताने होण्याची गरज आहे. या गुन्ह्यातील आरोपी विरुद्ध राष्ट्रद्रोहाचा गुन्हा नोंदवावा, कठोर कलमान्वये कारवाई व्हावी, यामागचा सूत्रधार ओळखावा, ट्रॉसिटी कलम मूळ तक्रारी मध्ये दाखल करण्यात यावे. अशा मागणीसाठी एक दिवसापूर्वी पोलीस स्टेशनवर मोर्चा आला. दुसऱ्या दिवशी पुन्हा मोर्चा आला. मागण्यात याच आहेत फक्त आता आरोपीचे नाव बदलले आहे. जिल्हा पोलिसांनी या प्रकरणांमध्ये अत्यंत चांगली कामगिरी केल्याने राज्यातील मोठा जातीय तणाव रोखला गेला आहे. याबद्दल आपण जिल्हा पोलीस प्रमुख मुमका सुदर्शन यांचे जाहीर रित्या अभिनंदनही केली आहे. सार्वजनिक जीवनामध्ये वावरताना अशा पद्धतीचे वर्तन किती घातक असते, याची जाणीव सर्वांना व्हावी म्हणून या गुन्ह्यातील आरोपीला शहरातील प्रमुख मार्गावरून मिरवावे. अशी लोकांची मागणी रास्त आहे. अशा विष वल्ली पोलिसांनी कायमच्या ठेचून काढल्या पाहिजेत. संपूर्ण महाराष्ट्र या घटनेने पेटून उठला असता, निरपराध लोकांना याचा त्रास झाला असता, या सर्व प्रकारांना वेळीच पायबंध पोलिसांच्या यशस्वी कारवाईमुळे बसला आहे. पोलीस दलाच्या चांगल्या कार्याचे जाहीर रित्या कौतुक व्हायला हवे.

पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी मोर्चाच्या वतीने निवेदन स्वीकारून आवश्यक ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शनिवार दि.११ जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## घारगाव पोलिसांची वाहतूक नियमभंगाविरोधात धडक मोहीम

### ३१० वाहनांवर कारवाई, २.११ लाखांचा दंड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : संगमनेर तालुक्यातील घारगाव पोलीस ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी पदभार स्वीकारताच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम हाती घेतली आहे.

या धडक मोहिमेअंतर्गत आतापर्यंत तब्बल ३१० वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, संबंधित वाहनचालकांकडून २ लाख ११ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. महामार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी ही मोहीम सातत्याने सुरू ठेवण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान पोलिसांनी विविध प्रकारच्या नियमभंगांवर कडक बोट ठेवले. यामध्ये नो पार्किंगमध्ये वाहने उभी करणे, महामार्गावर विरुद्ध बाजूने (रॉंग साईड) वाहन चालवणे, अवैध प्रवासी वाहतूक, मद्यप्राशन करून वाहन चालवणे, हेल्मेट आणि सीटबेल्टचा वापर न करणे, तसेच वाहनांची आवश्यक कागदपत्रे जवळ न बाळगणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्यात आली.

पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार नारायण ढोकरे यांच्या पथकाने ही कामगिरी प्रभावीपणे पार पाडली. पोलिसांच्या या अचानक सुरू झालेल्या कारवाईमुळे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

### अवैध क्रॉसिंग टाळा, जीव वाचवा...!

नाशिक-पुणे महामार्ग ओलांडताना वाहनचालकांनी स्वतःच्या सोयीसाठी तयार केलेले बेकायदेशीर रस्ते (क्रॉसिंग) वापरू नयेत. केवळ कायदेशीर क्रॉसिंगचाच वापर करावा. दंड वसूल करणे हा पोलिसांचा उद्देश नसून, नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करणे आणि अपघातांना आळा घालणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. वाहतूक नियमांचे पालन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून, नियम मोडणाऱ्यांवर यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहील.

**बाबासाहेब बोरसे, पोलीस निरीक्षक, घारगाव पोलीस ठाणे**

# कर्जतच्या नगराध्यक्षपदी भाजपाच्या छाया शेलार बिनविरोध

## राम शिंदे-रोहित पवार गटाची अनपेक्षित साथ चर्चेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : कर्जत नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी भाजपाच्या छाया सुनील शेलार यांची शुक्रवारी बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा प्रांताधिकारी तथा पीठासीन अधिकारी नितीन पाटील यांनी केली. माजी नगराध्यक्षा रोहिणी घुले यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी छाया शेलार यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने त्यांची निवड निश्चित झाली होती.



अधिकृत घोषणेनंतर नगरसेवकांनी जल्लोष करत ग्रामदैवत संत सद्गुरू गोदड महाराज मंदिरात दर्शन घेतले. या निवडीत विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या गटासोबत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे आमदार रोहित पवार समर्थक चार नगरसेवकांनी बिनशर्त पाठिंबा दिल्याने कर्जतच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली. विशेष सभेला राम शिंदे गटाचे नऊ व रोहित पवार गटाचे चार असे एकूण १३ नगरसेवक उपस्थित होते.

तर माजी नगराध्यक्षा रोहिणी घुले व त्यांचे समर्थक चार नगरसेवक अनुपस्थित राहिले. निवडीनंतर छाया शेलार यांनी आगामी काळात प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जतच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. सर्वांना सोबत घेऊन शहरातील विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. दरम्यान, नगराध्यक्षपदाची घोषणा होताच नव्या राजकीय समीकरणाचा आणखी एक परिणाम दिसून आला.

भाजपासह रोहित पवार गटाच्या १३ नगरसेवकांनी उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे यांच्याविरोधात अविश्वास ठराव दाखल केला. संबंधित स्वाक्षरीयुक्त पत्र मुख्याधिकारी अक्षय जायभाये यांच्याकडे सादर करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे नगरसेवक नामदेव राऊत यांनी कर्जतच्या विकासासाठीच भाजपाला पाठिंबा दिल्याचे सांगितले. मागील काही महिन्यांपासून नगरपंचायतीच्या कारभारात आलेल्या अडचणी दूर करून शहराचा विकास हेच प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी जामखेडच्या नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत, प्रतिभा भैलुमे, उषा राऊत, गटनेते सतीश पाटील, नगरसेवक व विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीमुळे कर्जतच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली असून आगामी राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

## श्रीरामपूर-नेवासा रोड ओव्हरब्रीजवर एसटी बस अन् कारचा भीषण अपघात

### कारचालक गंभीर जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर-नेवासा रोडवरील ओव्हरब्रीजवर, शुक्रवारी (दि. १० जुलै) रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास एसटी बस आणि मारुती सुझुकी ८०० कार चारचाकी वाहनात भीषण अपघात झाला. या अपघातात कारचालक गंभीर जखमी झाले असून, कारचे मोठे नुकसान झाले आहे.

ओव्हरब्रीजच्या अरुंद रचनेमुळे हा अपघात झाला असून, हा पूल आता वाहनधारकांसाठी 'डेथ ट्रॅप' ठरत असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिर्डीवरून वर्ध्याच्या दिशेने निघालेली एसटी बस आणि मारुती सुझुकी ८०० कार (क्रमांक एम एच १७ एन १३९५) यांची ओव्हरब्रीजवर समोरासमोर जोरदार धडक झाली.



हा अपघात इतका भीषण होता की, यामध्ये कारचा पुढचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. अपघातात कारचालक जावेद शेख (मेडिकल चालक, रा. वॉर्ड नं. १) हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा अपघात सकाळी ९ वाजेच्या सुमारास झाला. हा वेळ नोकरदार, व्यावसायिक आणि प्रवाशांच्या वर्दळीचा असल्याने ओव्हरब्रीजच्या दोन्ही बाजूंनी मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

घटनेची माहिती मिळताच श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जखमी जावेद शेख यांना तात्काळ रुग्णालयात हलविण्यात आले. क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करून विस्कळीत झालेली वाहतूक पूर्ववत सुरळीत केली. या घटनेचा पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहेत.

या ओव्हरब्रीजवर वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी प्रशासनाने या अरुंद पुलाचे व रस्त्याचे तातडीने रुंदीकरण करावे. तसेच, या ठिकाणी रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाश व्यवस्था लाईट करावी आणि वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी गतिरोधक व सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी तीव्र मागणी वडाळा महादेव, शिरसगाव आणि परिसरातील ग्रामस्थांमधून केली जात आहे.

### ओव्हरब्रीज बनतोय 'डेथ ट्रॅप'; रुंदीकरणाची तीव्र मागणी

या ओव्हरब्रीजवर अपघात होण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही या ठिकाणी अनेक भीषण अपघात झाले असून, अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. हा ओव्हरब्रीज अत्यंत अरुंद असल्याने समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज येत नाही आणि गतिमान वाहनांमुळे अपघात घडतात.

## कर्जतच्या सहाय्यक निबंधकाला लाच घेताना रंगेहात पकडले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : जिल्हा बँकेच्या निवडणुकीसंदर्भातील ठरावाची तक्रार दाबून टाकण्यासाठी तब्बल २५ हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी कर्जतचे सहाय्यक निबंधक मिलिंद प्रल्हादराव राऊत यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. तक्रारदार कर्जत तालुक्यातील एका विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सचिव आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी आवश्यक ठराव संचालक मंडळाने मंजूर केला होता. मात्र एका संचालकाने त्या ठरावावर आक्षेप घेत सहाय्यक निबंधकांकडे तक्रार दाखल केली.

ही तक्रार निकाली काढून ठरावाला अडथळा येऊ न देण्यासाठी कर्जतचे सहायक निबंधक मिलिंद राऊत यांनी २५ हजार रुपयांची लाच मागितली. त्यापैकी १० हजार रुपये आधीच घेतल्यानंतर उर्वरित रकमेसाठी सातत्याने तगादा लावला जात होता. अखेर त्रस्त झालेल्या तक्रारदाराने ९ जुलै २०२६ रोजी अहिल्यानगरच्या लाच लुचपत विभागकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीची पडताळणी करून शुक्रवारी ( दि १०) रोजी अहिल्यानगरच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारताच पथकाने सहाय्यक निबंधक मिलिंद राऊत यांना जागीच ताब्यात घेतले. या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७ अंतर्गत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

सदरची कारवाई अहिल्यानगर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पोलीस निरीक्षक सविता तांबे हे करीत आहेत.

## पढेगाव येथे महिलेस मारहाण

### वडिलास कोथळा काढण्याची दिली धमकी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : घरगुती कारणावरून २० वर्षीय महिलेस पढेगाव, (ता. श्रीरामपूर) येथे मारहाण करत तुझा कोथळा काढून टाकू, अशी धमकी देण्याचा प्रकार घडला आहे.

याबाबत, मिनाज शकील सय्यद, (वय २०, रा. पढेगाव, तोरणेवाडी),या महिलेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, माझे पती शकील सय्यद हे तू माझ्या आईशी कशाला वाद करते? असे म्हणत वाद घालायचे. तेव्हा तुमची आई व बहीण, आजेसासू या मला घालून-पाडून शिव्या देतात, असे आपण त्यांना म्हणालो असता त्याचा राग येवून पती, सासू, आजे सासू, नणंद यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत, शिवीगाळ करत दांड्याने बरगडी, कंबरेला मारून जमिनीवर आपटले.

यावेळी माझ्या आई वडिलांनी याबाबत त्यांना जाब विचारला असता तुझ्या पोरीला घेवून जा, आमच्या नादी लागला तर तुझा कोथळा काढू, अशी धमकी दिल्याचे मिनाज सय्यद या महिलेने फिर्यादीत म्हटले आहे.यांच्या फिर्यादीवरून शकील सय्यद, जुबेदा सय्यद, मुमताज सय्यद, गुड्डी (पुर्ण नाव माहिती नाही) यांच्याविरूद्ध श्रीरामपूर तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर तालुका पोलीस करीत आहेत.

## टाकळीभान येथे दोन शेळ्या चोरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील खिर्डी रस्त्यालगत मायकल प्रभाकर रणनवरे यांच्या पंचवीस हजार रुपयांच्या किमतीच्या दोन शेळ्या चोराने चोरून नेल्या, काल पहाटेच्या दरम्यान मायकल प्रभाकर रणनवरे यांच्या घरा शेजारून सुमारे पंचवीस हजार रुपये किमतीच्या दोन शेळ्या चोरीस गेल्या आहेत व चोरांनी रणनवरे यांच्या घराला बाहेरून दोन्ही दरवाजांना कडी लावली. रणनवरे सकाळी उठल्यानंतर घडलेल्या प्रकारच्या लक्षात आला काही दिवसापूर्वी टाकळीभान पोलीस स्टेशन समोरून अज्ञात चोरट्याने मोटरसायकल दिवसा चोरून नेली. त्याचा सुद्धा अद्याप तपास लागलेला नाही. शेतकऱ्यांचे नेहमीच विद्युत इलेक्ट्रिक मोटर पंप, स्प्रिंकलर, बोअरवेल मधील पंप सेट व यांच्या अनेकवेळा चोऱ्या झाल्या आहेत. सोमवारच्या आठवडे बाजारात अनेक मोबाईल चोरी होत आहे. त्यांचाही अजून पर्यंत तपास लागला नाही. टाकळीभान पोलीस दूर क्षेत्रात पोलीस हजर राहत नाही, त्यामुळे नागरिकांमध्ये पोलिसा विषयी नाराजी व्यक्त होत आहे.

# वाळूच्या बातम्यांच्या आडून खंडणीचा डाव!

## कोपरगाव तालुक्यात 'डिजिटल' पत्रकारांच्या नावाने वसुलीचे रॅकेट?

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यात वाळू वाहतुकीच्या नावाखाली एका शेतकऱ्याला कथितरित्या ब्लॅकमेल करून पैशांची मागणी केल्याचा अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. स्वतःला पत्रकार आणि गोदावरी बचाव कृती समितीचा सदस्य म्हणवणाऱ्या एका तोतया पत्रकाराविरोधात सांगवी भुसार येथील शेतकरी अजय किसन जाधव यांनी थेट कोपरगाव पोलीस ठाण्यात धाव घेत लेखी फिर्याद दाखल केली असून संबंधित स्वयंघोषित पत्रकार विरोधात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणावरून आता तथाकथित डिजिटल पत्रकारांच्या वाढत्या सुळसुळाटाचा आणि त्यांच्याकडून होणाऱ्या ब्लॅकमेलिंगचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. फिर्यादी अजय जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोळगाव थडी येथील मतीन बाबुलाल शेख याने गेल्या काही दिवसांपासून त्यांना सातत्याने फोन व व्हॉट्सअॅप कॉल करून लक्ष्य केले.

तुझे वाळू वाहतुकीचे फोटो आणि व्हिडिओ माझ्याकडे आहेत. तुझ्याविरोधात तहसीलदारांकडे तक्रार करीन, बातम्या लावीन, अशी भीती दाखवून संशयिताने २० हजार रुपयांची मागणी केली. धक्कादायक बाब म्हणजे, कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी मागितलेल्या या २० हजार रुपयांच्या रकमेसाठी आरोपीने २० शेळ्या असा सांकेतिक शब्द वापरल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.जाधव यांनी पैसे देण्यास नकार देताच, संबंधित व्यक्तीने सोशल मीडियावर त्यांच्याविरोधात बातम्या प्रसारित करण्यास सुरुवात केली. त्यानंतरही दबाव तंत्र सुरूच ठेवत, आता तुला पैसे द्यावेच लागतील, नाहीतर तुझ्यावर कारवाई करीन. तुझा ट्रॅक्टर पलटी करून टाकू किंवा तुझ्यावर हल्ला घडवून आणू, अशी थेट जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप तरुण शेतकऱ्याने केला आहे. या सर्व संभाषणांचे कॉल रेकॉर्डिंग आपल्याकडे असल्याचा दावा फिर्यादीने केला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.या घटनेच्या निमित्ताने कोपरगाव तालुका आणि परिसरात सध्या गल्लोगल्ली सुरू झालेल्या कथित युट्युब न्यूज चॅनेल्सचा आणि पोर्टलचा काळा चेहरा समोर आला आहे.

कोणतीही अधिकृत पार्श्वभूमी, पत्रकारितेचे नियम माहीत नसलेले अनेक जण हातात मोबाईल आणि गळ्यात ओळखपत्र अडकवून स्वतःला पत्रकार' म्हणवून घेत आहेत. काहींनी तर प्रेस नावाचे बोगस ओळखपत्र विक्रीचा धंदाच सुरू केला आहे. त्यामाध्यमातून अधिकारी, व्यावसायिक, शेतकरी आणि सर्वसामान्यांना किरकोळ कारणावरून किंवा खोट्या बातम्यांची भीती दाखवून हे कथित पत्रकार जाळ्यात ओढतात. कॅमेरा आणि सोशल मीडियाच्या ताकदीचा गैरवापर करून 'बातमी लावतो' अशी धमकी देणे आणि पडद्यामागून तोडपाणी करणे, हा काहींचा मुख्य व्यवसाय बनला आहे.

अशा तोतया आणि ब्लॅकमेलर्समुळे अहोरात्र प्रामाणिकपणे काम करणाऱ्या आणि समाजाला न्याय मिळवून देणाऱ्या खऱ्या, अधिकृत पत्रकारांची नाहक बदनामी होत आहे. वाळूविषयक बातम्यांच्या माध्यमातून दबाव टाकून पैशांची मागणी झाल्याचा हा आरोप आता पोलीस तपासाच्या केंद्रस्थानी आहे. या प्रकरणातील सत्यता पोलीस तपासानंतर समोर येईलच; मात्र अशा प्रकारे पत्रकारितेच्या आडून खंडणी मागणाऱ्या प्रवृत्तींचा वेळीच बंदोबस्त करणे गरजेचे झाले आहे.

जर कोपरगाव तालुका किंवा परिसरात कोणत्याही तोतया पत्रकाराने, युट्युब चॅनेलच्या प्रतिनिधीने तुम्हाला बातमीची किंवा कारवाईची धमकी देऊन पैशांची मागणी केली, तर अशा ब्लॅकमेलिंगला अजिबात बळी पडू नका. अशा लोकांविरोधात तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात ऑडिओ/व्हिडिओ पुराव्यांसह तक्रार नोंदवा, असे आवाहन कोपरगाव तालुका पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी केले आहे.

## श्रीरामपूर ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरऐवजी कर्मचाऱ्यांकडून रुग्ण तपासणीचा आरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : श्रीरामपूर येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांना डावलून कर्मचाऱ्यांकडून रुग्णांची तपासणी केली जात असून, चुकीचा वैद्यकीय सल्ला देत रुग्णांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी पाठविले जात असल्याचा गंभीर आरोप भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुनील मुथा यांनी केला आहे.

या प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी तालुका व जिल्हा आरोग्य प्रशासनाकडे केली आहे. सुनील मुथा यांनी दिलेल्या माहितीनुसार, बेलापूर येथील गर्भवती महिला अनिता वैभव पवार या तपासणीसाठी श्रीरामपूर ग्रामीण रुग्णालयात गेल्या असता, वैद्यकीय अधिकाऱ्यांऐवजी एका कनिष्ठ महिला कर्मचाऱ्याने त्यांची तपासणी केली.

संबंधित कर्मचाऱ्याने गर्भाशयाचे तोंड उघडल्याचे सांगत तातडीने खासगी रुग्णालयात किंवा लोणी येथील रुग्णालयात उपचार घेण्याचा सल्ला दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार लक्षात आल्यानंतर आपण तेथे उपस्थित असलेले कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्पेश गग्गड यांच्याकडे याबाबत विचारणा केली.

मात्र, मला याची माहिती नाही, मी पाहतो, असे उत्तर देत त्यांनी उडवाउडवीची भूमिका घेतल्याचा दावा मुथा यांनी केला. त्यानंतर संबंधित महिला कर्मचाऱ्याने अपमानास्पद वागणूक देत पुन्हा खासगी रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, संबंधित महिलेची खासगी रुग्णालयात तपासणी केली असता गर्भाशयाची स्थिती पूर्णपणे सामान्य असून कोणतीही गंभीर बाब नसल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केल्याचा दावा मुथा यांनी केला आहे.

या घटनेमुळे गरीब रुग्णांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून, शासनाच्या मोफत आरोग्य सेवेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. काही बेजबाबदार कर्मचाऱ्यांमुळे शासकीय रुग्णालयांची प्रतिमा मलिन होत असल्याचा आरोप करत हा प्रकार तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहन शिंदे तसेच ग्रामीण रुग्णालयाचे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक परदेशी यांच्या निदर्शनास आणून दिल्याचेही त्यांनी सांगितले. संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी सुनील मुथा यांनी केली आहे.

संबंधित गर्भवती महिलेला ७ जुलै रोजी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले तेव्हा डॉ. कल्पेश गग्गड यांनी त्यांची तपासणी केली. रुग्णालयात पूर्ण वेळ स्त्रीरोगतज्ज्ञ उपलब्ध नसल्यामुळे शहरातील डॉ. गोराणे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांचा सल्ला घेऊन संबंधित महिलेला रुग्णालयात ऍडमिट होण्याचा सल्ला दिला होता. महिलेचे कुटुंबीय व सुनील मुथा हे देखील त्यावेळी उपस्थित होते. मात्र त्यांनी ऍडमिट व्हायचे नसल्याचे सांगून घरी जाण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी कुठलाही वाद झाला नाही. मुथा यांच्या तक्रारी बद्दल मी रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांकडे पुन्हा चौकशी केली, मात्र संबंधित महिलेला योग्य उपचार व सल्ला दिल्याचे चौकशीत समजले.

**डॉ. दीपक परदेशी, वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय**

## अन्न व औषध प्रशासनाची टाकळीमियातील कारवाई संशयाच्या भोवऱ्यात, अद्याप गुन्हा दाखल नाही

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अन्न व औषध प्रशासनाने राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथे छापा टाकून दुधात भेसळ करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. मात्र या घटनेला दोन दिवस उलटूनही अद्याप राहुरी पोलीस ठाण्यात या प्रकरणी कोणताही गुन्हा दाखल झाला नाही. त्यामुळे सदर कारवाई बाबत तालूक्यात चर्चेला उधाण आले आहे. या बाबत समजलेल्या माहितीनुसार अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने दोन दिवसांपूर्वी रात्री गुप्त माहितीच्या आधारे राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथील एका व्यक्तीच्या घरी छापा टाकल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान या कारवाईत दुधात भेसळ करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य आणि पावडरचा साठा आढळून आल्याचे समजले. परंतु या कारवाई बाबत अन्न व औषध प्रशासनाकडून अद्याप गुन्हा दाखल केला नाही. किंवा कोणतीही अधिकृत माहिती अथवा प्रेसनोट प्रसिद्ध करण्यात आली नसल्याचे दिसून येत आहे. आय ए एस अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार राज्यभर दुध भेसळ विरोधात कारवाई करण्यात येत आहे. गेल्या आठवड्यात पुणे जिल्ह्यातील मंचर परिसरात कृत्रिम दूध व भेसळी विरोधात मोठी कारवाई करण्यात आली होती. यामध्ये राहुरी तालुक्यातील प्रमोद घोरपडे, प्रकाश कडू, अजित कारंडे यांना आरोपी करण्यात आले. टाकळीमिया येथील मोरवाडी परिसरातील प्रमोद घोरपडे याला मंचर पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली. त्यानंतर टाकळीमिया येथे पथकाने कारवाई केली. मात्र सदरची कारवाई संशयाच्या भोवऱ्यात आली असुन पथकाने नेमकी काय कारवाई केली हे समजू शकले नाही. तसेच याबाबत अद्याप गुन्हा दाखल नसल्याने परिसरात चर्चेला उधाण आले आहे.